


गुरु नानक जयंतीच्या हार्दीक शुभेच्छा !

दैनिक
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.
RNI No.MAHMAR/2019/79184
www.lakshamaharashtra.com
lakshamaha.dhule@gmail.com
lakshamaha.nsk@gmail.com




न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स, धुळे

डेली सर्व्हिस - इंदौर, मुंबई, पुणे, अहमदाबाद, नागपूर, अमरावती, अकोला

लग्न समारंभासाठी व शैक्षणिक सहलीकरिता 2x2 आकर्षक बसेस भाडेतत्वावर मिळतील.

2x1 A/C स्लीपर कोच

संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे


धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ५ थे | अंक : २३ वा | सोमवार दि. २७ नोव्हेंबर २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## न्यूज कॉलम

### भांडणाच्या कुरापतीतून चारा पेटविला

नंदुरबार । नवापूर तालुक्यातील देवलीपाडा चितवी येथील दाविद मोगऱ्या गावित यांच्या घरामागील मोकळ्या जागेत म्हशीच्या खाद्यासाठी दोन आयशरमध्ये चारा भरुन ठेवला. सावत वश्या गावित याने मागील भांडणाच्या कारणावरुन दाविद गावित यांच्या मालकीचे दोन्ही आयशर ट्रकमधील चाऱ्याला मध्यरात्री आग लावून पेटवून १५ हजार रुपयांचे नुकसान केले.

.....................................

### किराणा दुकानात दोंडाईचा येथे चोरी

**धुळे** । दोंडाईचा येथील माखिजा कॉम्प्लेक्समधील माँ नैनोत किराणा दुकानाचे मागील शटर तोडून चोरट्यांनी वीस हजारांचा किरणा माल लंपास केला. ही घटना २१ ते २२ नोव्हेंबरदरम्यान रात्री घडली. याबाबत दुकानदार भगत शामनदास राजानी (वय ५५, रा. सिंधी कॉलनी, दोंडाईचा) यांच्या तक्रारीनुसार गुन्हा नोंद झाला. तसेच दोंडाईचातील भाजी मंडई येथे मोहन पानसेंटर समोरून चोरट्याने सायकल नेली. ही घटना २२ ला रात्री घडली. महेश राजेंद्र सैंदाणे (रा. विद्या कॉलनी, दोंडाईचा) याच्या तक्रारीनुसार चोरट्यावर गुन्हा दाखल झाला.

# नाशिकमध्ये जोरदार पाऊस तर धुळ्यात रिमझिम; काही ठिकाणी गारांचा वर्षाव

धुळे । दोन दिवसांपासून राज्याच्या अनेक भागामध्ये तुरळक पावसाने हजेरी लावली आहे. रविवारी मात्र नाशिकमध्ये मुसळधार पावसाला झाला ते धुळ्यात रिमझिम पाऊस होता.

नाशिकमधल्या कसबे, मौजे सुकेने आणि परिसरात बिगर मौसमी पाऊस कोसळत आहे. तर सुकेने परिसरात गारांचा वर्षात झाला. यासह सिन्नर परिसरातदेखील पाऊस कोसळत आहे. आठवडा बाजार असल्यामुळे नागरिकांची धावपळ झाली. सुकेने, सिन्नरसह चांदोरी परिसरामध्येही गारांचा पाऊस कोसळला आहे. अवकाळी कोसळलेल्या या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालेलं आहे. शनिवारी पुण्याच्या काही भागात पावसाने तुरळक हजेरी लावली होती. लासलगाव शहरात काल रविवारी दुपारी तीन वाजेच्या सुमारास विजेच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने सुमारे दोन तास जोरदार हजेरी लावल्याने शहरातील रस्ते जलमय झाले तर वीजपुरवठा देखील खंडित झाला होता. हवामान विभागाने अनेक भागात काल अवकाळी पावासाचा अंदाज वर्तवला होता.अचानक आलेल्या या अवकाळी पावसामुळे रविवारच्या आठवडे बाजारात भाजीपाला विक्री करण्यासाठी आलेल्या शेतकऱ्यांची व ग्राहकांची चांगलीच तारांबळ उडाली.अचानक आलेल्या पावसामुळे हवेत गारवा निर्माण झाला.

या अवकाळी पावसाने द्राक्ष बागायतदारांची झोप उडाली असून द्राक्ष बागायतदार शेतकऱ्यांचा जीव टांगणीला लागला आहे.या पावसामुळे घडकुज,घडगळ यासह व डाऊनी रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांचा औषध फवारणीचा खर्च वाढणार आहे तसेच कांदा रोपाचे नुकसान होण्याची शक्यता आहे.मात्र इतर रब्बी पिकांना फायदा होईल.नाशिक जिल्ह्यात हवामान खात्याकडून ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. हिवाणी मोसमी वारे सक्रीय झाल्यामुळे बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे.यामुळे महाराष्ट्रात पाऊस पडत आहे.मोसमी वारे महाराष्ट्रातील पश्रि्चम किनारपट्टीकडे आगेकूच करणार आहेत.उत्तर महाराष्ट्रातील नाशिक,जळगाव,धुळे,नंदुरबार जिल्ह्यात रविवार सकाळपासून ढगाळ वातावरण निर्माण झाले होते.

नाशिकमध्ये ढगाळ वातावरण होते. सुर्यदर्शनही तुरळक झाले. याशिवाय आज पहाटेपासूनच पावसाचे थेंब पडू लागले होते. त्यामुळे जिल्ह्यात पावसाची शक्यता वर्तविण्यात येत होती. तर हवामान विभागाने २५ व २६ नोव्हेंबर रोजी अवकाळी पावसाचा अंदाज वर्तविला होता तो खरा ठरला.





### द्राक्ष बागायतदारांची उडाली झोप

**या अवकाळी पावसाने द्राक्ष बागायतदारांची झोप उडाली असून द्राक्ष बागायतदार शेतकऱ्यांचा जीव टांगणीला लागला आहे.या पावसामुळे घडकुज,घडगळ यासह व डाऊनी रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांचा औषध फवारणीचा खर्च वाढणार आहे तसेच कांदा रोपाचे नुकसान होण्याची शक्यता आहे.मात्र इतर रब्बी पिकांना फायदा होईल.नाशिक जिल्ह्यात हवामान खात्याकडून ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.**



### भडणे येथे अवकाळी पावसामुळे चारा पिकांचे नुकसान

**चिमठाणे । प्रतिनिधी शिंदखेडा तालुक्यातील भडणे परिसरात काल अवकाळी पावसामुळे शेतावर कामाला गेलेले शेतमजूर पावसामुळे घरी परतले मात्र या पावसामुळे शेतकऱ्यांचा मका, ज्वारी, बाजरी, भुईमूग तसेच इत्यादी साठवणूक केला चारा पावसाच्या पाण्यामुळे खराब झाल्यामुळे गुरांच्या चाऱ्याचे आर्थिक मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिकच अडचणी सापडला आहे. बाहेरून मकाचा चारा महागडे ट्रॅक्टरच्या साह्याने गुरासाठी आणला होता. मात्र अगोदरच यावर्षी दुष्काळ सदस्य परिस्थिती असताना चारा व उत्पन्न जेमतेम आले आहे. परिसरात चारा खराब झाल्यामुळे शेतकरी वर्गाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सदर माहिती भडणे येथील पोलीस पाटील युवराज माळी यांनी तलाठी रुपेश कोळी यांना दिली. या अवकाळी पावसामुळे काही प्रमाणात हरभरा, दादर, पिकांना फायदा होईल तर मोठ्या प्रमाणावर दादर व गुराच्या चारा यांचे नुकसान झाल्याने शेतकरी हवालदीर झाला आहे.**

# साक्री शहरात सशस्त्र दरोडा टाकून तरुणीलाही पळवून नेले



### घटनेने शहर हादरले, पोलिसांना आव्हान

**साक्री । प्रतिनिधी**

शहरातील सरस्वती नगर मधील घरात दरोडेखोरांनी सशस्त्र दरोडा टाकीत तरुणीलाही पळवून नेण्याची घटना घडली. शनिवारी मध्यरात्री घडलेल्या या घटनेने संपूर्ण साक्री शहर हादरले आहे. नवनिर्वाचित पोलीस अधीक्षक श्रीकांत देवरे यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी पाहणी केली असून दरोडेखोरांचा शोध घेण्यात येत आहे. या घटनेने पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे केले. येथील सरस्वती नगरमध्ये ब्युटी पार्लर चालक एका महिलेचे (वय ४०) वास्तव्य आहे. काल मध्यरात्री महिला आपल्या भाजीसह घरी एकटीच होती. साडेदहा नंतर चार चाकी वाहनाने पाच ते सहा दरोडेखोरांनी घरात प्रवेश केला, महिलेला मारहाण करीत बेडरूममध्ये नेले. तोंड दाबून तिचे हात पाय बांधले, त्या पाठोपाठ तिच्या भाचीला (वय २३) मारहाण करीत बेडरूम मध्ये आणले. दोघांकडून पैशांची, दागिन्यांची विचारपूस केली. सर्व दागिने त्यांनी कपाटातून काढले. घरातील साहित्याची नासधूस केली, त्यातील एकाने महिलेसह तिच्या भाचीला बंदुकीचा आणि धारदार चाकूचा धाक दाखवून मारण्याची धमकी दिली. सोन्याची माळ मंगळसूत्र अंगठी कानातील दागिने चांदीचे पैंजण असे एकूण ९० हजारांची दागिने दरोडेखोरांनी लुटून नेले. एवढ्यावरच न थांबता त्यांनी २३ वर्षीय तरुणीलाही गाडीत बसून पळवुन नेले. लुटमार अपहरणाच्या या घटनेने साक्री शहरासह परिसरात एकच खळबळ उडाली आहे. साक्री पोलीस ठाण्यात दरोडा पळून नेल्याचा गुन्हा दाखल झाला. सोन्याच्या दागिन्यांची किंमत आजच्या बाजारभावानुसार अडीच लाखांपेक्षा जास्त आहे. घटनेची माहिती पोलिसांना कळताच उपविभागीय पोलीस अधिकारी साजन सोनवणे यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देत याबाबत वरिष्ठांशी चर्चा केली. फिंगरप्रिंट व श्र्वान पथकास पाचारण करण्यात आले.

# धुळ्यातील कार्तिक स्वामींचे मंदीर दर्शनासाठी उघडले

**धुळे । प्रतिनिधी**

कार्तिक पोर्णिमेनिमित्त येथील चाळीसगाव रोडवरील गिता जिनींग व प्रेसिंग कारखान्याच्या आवारातील श्री. कार्तिक स्वामींचे मंदिर चंद्र ग्रहणामुळे दि. २६ नोव्हेंबर रोजी उघडण्यात आले. भाविकांना व्यवस्थीत दर्शन घेता यावे, यासाठी मंदिर व्यवस्थापनाने युध्द पातळीवर तयारी केली आहे.

जुन्या पिढीतील या मंदिरात दरवर्षी भाविकांची प्रचंड गर्दी होत असल्याने आवश्यक त्या ठिकाणी प्रखर झोत फेकणारे दिवे, बॅरिकेटस लावण्यात आले आहेत. प्रत्येक भक्तांना मास्क लावणे व सामाजिक अंतर ठेवणे बंधनकारक आहे. दर्शन घेतांना रांगेत प्रत्येक ठिकाणी सामाजिक अंतर ठेवणे आवश्यक आहे. जर कोणाला सर्दी, खोकला किंवा ताप असल्यास त्याने मंदिर परिसरात प्रवेश करु नये. भाविकांनी यंदाही दर्शनाचा लाभ मोठ्या प्रमाणात घ्यावा, असे आवाहन अग्रवाल यांनी केले आहे.



धुळे येथील चाळीसगाव रोड लगत गिता जिनींग व प्रेसिंग कारखाना आहे. पूर्वीच्या बिजेराम डेडराज ऑईल मिल आवारात शेठ पन्नालाल जीवनराम अग्रवाल यांनी संवत १९८२ श्रावण शुध्द अष्टमीच्या दिवशी श्री. महादेव मंदिराची स्थापना केली. याच वेळी या जुन्या पध्दतीच्या घुमट आकाराच्या मंदिरात गणपती, शिवशंकर, पार्वती माता व हनुमानजी यांच्या आकर्षक अशा संगमरवरी मुर्तीसह श्री. कार्तिक स्वामीच्या मुर्तीची स्थापना झाली. तेव्हा पासून या ठिकाणी येणार्या भाविकांची नंतरच्या काळात श्रध्दा दृढ होत गेली. हे मंदिर जागृत असल्याची भावना निर्माण झाल्याने दरवर्षी या मंदिरात सतत महिला व पुरुषांची गर्दी वाढतच राहिली आहे. या पार्श्वभूमीवर मंदिराचे प्रमुख भरत अग्रवाल यांनी यंदाही भाविकांच्या सुविधेसाठी योग्य ती व्यवस्था करण्याचे प्रयत्न केले आहेत. मंदिराकडे जाणार्या रस्त्यांवर प्रखर झोत फेकणारे दिवे, रस्त्यांची डागडुगी व स्वच्छ करणे, मंदिराची विद्युत रोषणाई, परीसर स्वच्छता या कामावर भर देण्यात आला आहे. संपूर्ण उत्तर महाराष्ट्रात श्री. कार्तिक स्वामींचे मंदिर अपवादात्मक ठिकाणीच आहेत.याची भाविकांनी नोंद घ्यावी. दर्शनासाठी होणारी गर्दी लक्षात घेता भाविकांनी आपआपली लहान मुले, किंमती वस्तु आणि वाहनांवर स्वतःच लक्ष ठेवावे. मंदिरात ध्वनीक्षेपण यंत्रणेद्वारेमंत्रोपचार, पूजाअर्चा आदिचा धार्मिक कार्यक्रम होणार असल्याने रांगेतूनच दर्शन घ्यावे व शिस्तीचे पालन करावे. तसेच कार्तिक पोर्णिमेनिमित्त किर्तनाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला आहे. भाविकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

# पुलाचा कठडा तोडून ट्रक नदीत कोसळला

**धुळे । प्रतिनिधी**

इंदोरकडून मुंबईच्या दिशेने जात असलेल्या ट्रकचा टायर फुटल्याने ट्रक पुलावरून थेट नदीपात्रात गेल्याचा प्राथमिक अंडज वर्तविला जात आहे.



शिरपूरजवळील तापी नदीच्या सावळदे पुलावरून ट्रक जात असताना हा अपघात घडला असून ट्रक थेट तापी नदी पात्रात बुडाला आहे.

धुळे जिल्ह्यातील शिरपूरच्या तापी नदीवरील सावळदे पुलावरून थेट तापी नदी पात्रात ट्रक बुडाल्याची घटना उघडकीस आली आहे. पुलावरून ट्रक नदीत पडल्याने पाण्यात बुडाला आहे. यापूर्वी देखील अशा प्रकारच्या घटना सातत्याने या पुलावर झाल्या आहेत. तरी देखील प्रशासनातर्फे कुठल्याही प्रकारची उपाययोजना केली जात नसल्यामुळे प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर प्रश्र्नचिन्ह केले जात आहेत. यापूर्वी देखील जलसमाधी मिळालेल्या वाहनांना बाहेर काढण्यात प्रशासनाला यश आले नसून आता बुडालेल्या ट्रकला बाहेर काढण्यात प्रशासनाला यश मिळेल का हे बघणं औचित्याच ठरणार आहे.इंदोरकडून मुंबईच्या दिशेने जात असलेल्या ट्रकचा टायर फुटल्याने ट्रक पुलावरून थेट नदीपात्रात गेल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात येत असून ट्रकमध्ये किती जण अडकले या संदर्भात अद्याप माहिती मिळू शकली नाही, यासाठीचे शोधकार्य सुरु करण्यात आले आहे.

# आजाद समाज पार्टी तर्फे 'संविधान दिन' उत्साहात साजरा

**धुळे । प्रतिनिधी**

आजाद समाज पार्टीच्या वतीने धुळे महानगरपालिकेच्या बाहेर 'भारतीय संविधान दिन' कार्यक्रम साजरा करण्यात आला.

धुळे महानगरपालिकेबाहेरील चौकास 'संविधान चौक' म्हणून जाहीर मान्यता देवून याच ठिकाणी संविधानाची भव्य प्रतिकृती उभारण्यात यावी. तसेच आयुक्त कार्यालयासह मनपातील सर्व अधिकारी, पदाधिकारी यांच्या कार्यालयांमध्ये व सभागृहात संविधानाची प्रास्ताविका व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा लावण्याचे आदेशित करावे. सातत्याने जनतेच्या मूलभूत समस्या व नागरी प्रश्र्नांवर नेहमीच आवाज उठवून आंदोलनांच्या माध्यमातून प्रशासनाचे लक्ष वेधून प्रश्र्नांच्या सोडवणूकीचा प्रयत्न करीत असतो. मग त्यात पाणीपुरवठा असो किंवा इतर समस्या असो. आम्ही जनभावना पोटतिडकीने मांडत असतो. मात्र आमच्या आंदोलनांना परवानगी न देणे, आंदोलनास अटकाव करणे, अडसर निर्माण करणे, पोलीस प्रशासनावर दबाव आणून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न करण्यात आला. लावलेले लक्षवेधी बॅनर्स हटविणे अशा प्रकारे आमचा आवाज



दाबण्याचा सातत्याने काही विशिष्ट मंडळी प्रयत्न करीत असतात. लोकशाही, संवैधानिक मार्गाने जनतेचे प्रश्र्न मांडताना आम्हाला विरोध होत असतो. त्यामुळे आम्ही नावाला असलेल्या लोकशाही राज्यात हुकुमशाहीचा सामना करीत आहोत अशी तीव्र चीड आमच्या मनात निर्माण झाली आहे. तसेच एरवी अनेक मंडळी, संस्था, संघटना यांनी लावलेले सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक कार्यक्रमांचे मोठ मोठे बॅनर शहरभर झळकतात. त्यातील काही कायदेशीर तर काही विनापरवानगी लावलेले असतात. त्यावर आपण काय कारवाई करतात? शहरासह जिल्ह्यात या मंडळी व संघटनांना संविधानाचे महत्त्व वाटत नसेल का? संविधानाच्या राज्यात राहणारे हे लोक व प्रशासनही संविधानाप्रती एवढे उदासीन का? इतर लाखो करोडोंच्या संख्येप्रमाणे संविधान दिनाचे सोहळे का साजरे केले जात नाहीत. जनतेच्या प्रश्र्नांवर आवाज उठविणे गुन्हा आहे का? लोकशाही मार्गाने आंदोलने करणे गुन्हा आहे का? आजचा हा संविधान दिवस जगभरात साजरा होत असतांनाच आंबेडकरी समुदाय व आंबेडकरी विचारधारेचे पक्ष- संघटना हा दिवस मोठ्या संख्येने साजरे करीत आहेत. परंतु अन्य राजकीय पक्ष-संघटना या फक्त नावालाच पुरोगामी आहेत. अशी नाराजी देखील व्यक्त केली. या कार्यक्रमास आजाद समाज पार्टीचे महाराष्ट्र कार्याध्यक्ष आनंद लोंढे, जिल्हाध्यक्ष आबा अमृतसागर, उत्तर महाराष्ट्र महासचिव सुखलाल बैसाणे, पक्षाचे सर्व कार्यकर्ते, समाज समता संघाचे जिल्हाध्यक्ष किरण गायकवाड यांच्यासह संजय आहिरे, उमेश आहिरे, सुरेश वैदे, चिंतामण थोरात, मुकेश वाघ, महेंद्र सोनवणे, विशाल वाघ, रोहित सोनवणे, विक्की लोंढे, नरेंद्र मोरे, भूषण जोशी, आदी उपस्थित होते.

# देवपूर बसस्थानकात, शाळा, कॉलेजसमोर रोडरोमिओंची दादागिरी

**धुळे । विशेष प्रतिनिधी**

विविध शैक्षणिक संस्था तसेच कोचिंग क्लासेस परिसरात विद्यार्थिनींचा पाठलाग करून छेड काढण्याचे प्रकार वाढले आहेत. त्यामुळे मुलींमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. 'कशाला नादी का लागायचे?' असे म्हणत विद्यार्थिनी पालक शांत बसत असल्यामुळे टवाळखोरांची हिंमत वाढत आहे. तसेच देवपूर बस स्थानकात येऊन सोशल मीडिया रील बनवत छेड काढण्याचे प्रकार वाढत आहेत. त्यामुळे रोडरोमिओंना आता पोलिसांनीच लगाम लावणे गरजेचे आहे, असे मत नागरिकांतून व्यक्त होत आहे.

शहरात नामांकित शाळा महाविद्यालये आहेत. याशिवाय विविध कोचिंग क्लासेस मिळून आहेत. शैक्षणिक संस्थांची भर पडली आहे. या शैक्षणिक संस्था कोचिंग क्लासमध्ये ये-जा करणाऱ्या विद्यार्थिनींची रोडरोमिओंकडून नेहमी छेड काढली जाते. विशेषत: या शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांपेक्षा शाळाबाह्य रोडरोमिओंचा जास्त त्रास होत असल्याचे समोर येत आहे. त्यामुळे विद्यार्थिनींमध्ये असुरक्षिततेची भावना आहे. अनेक विद्यार्थिनींनी या त्रासाबाबत पालकांनाही सांगितले. पण उगीच भानगड नको, म्हणून पोलिसांत तक्रार केली जात नाही. त्यामुळे रोडरोमिओंचे धाडस वाढत आहे.

विद्यार्थिनी रस्त्याने जात असल्यास रोडरोमिओ वेगाने गाडी चालवून त्यांना कट मारतात. अनेकदा चित्रविचित्र हावभाव करणे, इशारे करणे किंवा अश्र्लील शब्द उच्चारून छेड काढण्याचे प्रकार घडत आहेत. तसेच हे प्रकार देवपूर बस्थानकाच्या आवारात देखील घडत आहेत. शाळा-महाविद्यालयांच्या रस्त्यावर असे प्रकार नेहमीच दिसून येतात. जवळपास सर्वच शैक्षणिक संस्था तसेच कोचिंग क्लासेस परिसरात छेडछाडीचे प्रकार होतात. हा सर्व प्रकार शैक्षणिक संस्थांच्या परिसरात सुरू असूनही संबंधित संस्थाचालकांचे कानावर हात आहेत. पालक मुलींची बाजू असल्यामुळे हतबल असल्याचे दिसून येत आहे.

### विद्यार्थिनींची कुचंबणा



**रोडरोमिओंचा कायम शाळा, महाविद्यालये कोचिंग क्लास परिसरात वावर असतो. शाळा आणि शिकवणी सुटण्याच्या वेळेवर त्यांचे लक्ष असते. वेळेपूर्वीच ते हजर होतात. विद्यार्थिनी एकटी असेल, तर टवाळखोर तिची छेड काढतात. बहुतांश शैक्षणिक संस्थांमध्ये शहरातील ठरावीक भागातील युवक टोळके करुन उभे राहतात. त्यांच्याशी पंगा घेण्यास इतर विद्यार्थी घाबरतात. एखाद्या मुलीने पालकांना सांगितल्यास पालक तिला आजच्या दिवस शाळेत जाऊ नको, असे सांगून तिची समजूत काढतात. त्यामुळे रोडरोमिओंना चाप लागणे दूरच, पण विद्यार्थिनींमध्येच दहशत निर्माण झाली आहे.**

### धाकच उरला नाही

**शाळा,महाविद्यालये सुरु झाली की रोडरोमिओंचा त्रास सुरु होतो. त्यामुळे जून महिन्यापासून निर्भया, दामिनी पथके कार्यरत होतात. शहरातही पोलिसांची अशी विशेष पथके आहेत. पण शहरातील शैक्षणिक संस्थांची संख्या आणि पोलिस पथकांचे मनुष्यबळ यामध्ये कमालीची विसंगती आहे. शिवाय एकाच वेळी ही पथके सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये जाऊ शकत नाहीत. त्यामुळे रोडरोमिओंचे फावत आहे. पोलिसांचे वाहन पाहताच रोडरोमिओ पळ काढतात. पोलिस चक्कर मारुन निघून गेले, की पुन्हा रोडरोमिओंचेच राज्य असते. बहुतांश शैक्षणिक संस्थांमध्ये असेच चित्र दिसत आहे.**

# 'केसं पांढरे होऊन उपयोग काय?' मनोज जरांगेंचं भुजबळांना प्रत्युत्तर

**मुंबई । प्रतिनिधी**

ओबीसी समाजाचा महाएल्गार मेळावा आज (रविवार) मराठवाड्यातील हिंगोली येथे पार पडला. बीडमध्ये झालेल्या ओबीसी समाजाच्या सभेत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्यावर जोरदार टीका केली. यानंतर जरांगे यांनी देखील भुजबळांना प्रत्युत्तर दिलं आहे.

मराठा आरक्षणाविरोधात भूमिका घेत असलेल्या भुजबळांनी सभेत घेतलेल्या आक्षेपांवर बोलताना जरांगे म्हणाले की, भुजबळ कोर्टाच्या पुढचा न्याय करणार का? स्वतःला काय समजत आहेत कळत नाही. वयामानाने होत आहे, जाऊद्या. त्यांच्या म्हणण्याने कायदा चालत नाही. मराठा समाजाला आरक्षण नक्की मिळेल असे मनोज जरांगे म्हणाले. बीडच्या सभेत बोलताना भुजबळ जेवढे माझे केस पिकलेत तितके आंदोलनं भुजबळाने केली आहेत असं म्हणाले होते. यावर बोलताना, केस पांढरे होऊन उपयोग काय? जर बोलयचंच कळत नाहीये तर... मग नुसते केस पांढरे होऊन आणि आंदोलन करून उपयोग काय? एखाद्या समाजाविरोधात गरळ ओकायची आणि कायद्याच्या पदावर बसून अशी भाषा बोलायची अशा शब्दात जरांगे पाटील यांनी भुजबळांना प्रत्युत्तर दिलं.

## मुंबईच्या प्रगतीसाठी सुरक्षितता महत्त्वाची

देशाची आर्थिक राजधानी म्हणून गेली कित्येक वर्षे नावारूपास आलेल्या मुंबई शहराला अधूनमधून कशाची तरी लागण लागते आणि शहरातील वातावरण बिघडू पाहते. मुंबई हे सर्व दृष्टीने आणि सर्वांसाठी सुरक्षित शहर म्हणून ओळखले जाते. म्हणूनच हे शहर कधीच गाढ झोपत नाही आणि रात्रीही येथील व्यवहार सुरळीत सुरू असतात. हे सर्व येथील पोलीस यंत्रणेसह प्रशासकीय व अन्य यंत्रणांच्या चोख कामगिरीमुळे शक्य होत आहे. अशा या मुंबापुरीला विकासाचा आणखी साज चढविण्याचा प्रयत्न राजकीय आणि शासकीय माध्यमांतून जोरदार सुरू आहेत. त्यासाठीच येथे नानाविध प्रकल्प राबविले जात आहेत. मुंबईमध्ये एकीकडे जागतिक दर्जाच्या सुविधा उभारण्याची अहमहमिका सुरू असताना दुसरीकडे महानगरीतील नागरिकांच्या जीवनाच्या गुंतागुंतीच्या समस्याही आहेत. अशा या विश्वविख्यात शहरातील कायदा व सुव्यवस्था चोख राखण्याचे महत्त्व दुर्लक्षित करता येणार नाही.

लहान-मोठ्या सर्वच प्रकारच्या धोक्यांपासून, गुन्ह्यांपासून लोकांना खात्रीने संरक्षण तेव्हाच मिळेल जेव्हा गुन्हे नोंदणी, तपासकार्य आणि न्यायप्रक्रियेचे काम कार्यक्षमपणे होईल. अशा या प्रमुख शहरातील गुन्हेगारीचे जळजळीत आणि तितकेच चिंताजनक वास्तव पुढे आल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. 'मुंबईतील पोलीस यंत्रणा आणि कायदा व सुव्यवस्थेची सद्यस्थिती २०२३' हा शहराच्या समाजव्यवस्थेचा लेखाजोखा मंडणारा प्रजा फाऊंडेशनचा अहवाल नुकताच प्रकाशित झाला आहे. या अहवालातील एकूणच वास्तवाची गंभीर दखल घेऊन पोलीस व कायदा सुव्यवस्थेतील सुधारणांना तातडीने प्राधान्य दिले पाहिजे असेही अहवालात नमूद केले आहे. या अहवालामध्ये पोलीस यंत्रणेतील सुधारणा, गुन्हेगारीचे स्वरूप व प्रमाण, बालकांविरुद्धचे लैंगिक गुन्हे (पोक्सो) आणि सायबर गुन्हे यांचे चिंताजनक वाढते प्रमाण, फोरेन्सिक विभाग आणि पोलीस दलातील अपुरे मनुष्यबळ या मुद्द्यांची तपशीलवार चर्चा केलेली आहे.

मुंबईमध्ये २०१३ ते २०२२ या १० वर्षांच्या काळात बलात्काराच्या नोंदी झालेल्या घटनांची संख्या ३९१ वरून ९०१ वर पोहोचली आहे. ही संख्या १३० टक्क्यांनी वाढली आहे. यासह विनयभंगाच्या घटना १,१३७ वरून १०५ टक्क्यांनी वाढून २,३२९ वर आल्या आहेत. २०२२ मध्ये दाखल बलात्काराच्या एकूण गुन्ह्यांपैकी ६३ टक्के केसेस अल्पवयीन मुलींवरील बलात्काराच्या असून त्या 'पॉस्को' कायद्याखाली दाखल झाल्या. या पॉस्को खाली दाखल गुन्ह्यांपैकी ७३ टक्के केसेसचा तपास २०२२ च्या अखेरपर्यंत प्रलंबित होता. २०१८ ते २०२२ या दरम्यान सायबर गुन्ह्यांमध्ये २४३ टक्क्यांनी वाढ झाली आहे. म्हणजेच त्यांची संख्या १ हजार ३७५ वरून ४ हजार ७२३ पर्यंत वाढली. याच काळात क्रेडिट कार्ड घोटाळे/ फसवणुकीच्या केसेसचे प्रमाण ६५७ टक्क्यांनी वाढले. तर २०२२ मध्ये नोंदवलेल्या सायबर गुन्ह्यांमधील गुन्हेगार सापडण्याचे प्रमाण केवळ ८ टक्के होते.

त्यातच जगभरात सायबर गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. मुंबईमध्ये वर्ष २०१८ ते २०२२ या कालावधीत सायबर गुन्ह्यांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. वर्ष २०१८ मध्ये मुंबईमध्ये १ सहस्र ३७५ असलेले सायबर गुन्हे वर्ष २०२२ मध्ये ३ सहस्र ७२३ पर्यंत वाढले आहेत. यामध्ये 'क्रेडिट कार्ड'द्वारे फसवणूक केल्याचे गुन्हे सर्वाधिक आहेत. या दिशानिर्देशातील एक सुधारणा ही पोलिसांची विविध कार्ये स्वतंत्र करण्यासंबंधीची आहे. महाराष्ट्राचे माजी पोलीस महासंचालक संजीव दयाल यांनी या संदर्भात सेशन कोर्टात निवाड्यासाठी जाणाऱ्या केसेसचे तपासकार्य यंत्रणा कायदा व सुव्यवस्था यंत्रणेपासून स्वतंत्र असावे, अशा शीर्षकाचा एक स्थायी आदेश २४ मे २०१५ रोजी जारी केला होता; परंतु आपल्या रेकॉर्डमध्ये स्वतंत्र तपासकक्षाचा डेटा अभिलेखावर उपलब्ध नसल्याचे मुंबईतील पाचपैकी तीन पोलीस विभागीय कार्यालयांनी माहिती अधिकाराखालील अर्जाच्या उत्तरात कळवले असल्याचे सांगण्यात आले.

सायबर गुन्ह्यांचे प्रमाण मुंबईतही वाढले असून, २०१८ ते २०२२ या कालावधीत त्यात २४३ टक्क्यांनी वाढ झाली आहे. आकडेवारीनुसार सायबर गुन्ह्यांची संख्या १३७५ वरून ३७२३ पर्यंत वाढली आहे. २०२२ मध्ये 'क्रेडिट कार्ड फसवणुकीचे सायबर गुन्हे सर्वाधिक नोंदवलेले असून, या कालावधीत क्रेडिट कार्ड फसवणुकीचे गुन्हे ४६१ वरून ३४९० एवढे वाढले आहेत. म्हणजेच त्यात ६५७ टक्क्यांनी वाढ झाली आहे. याशिवाय गुन्ह्यांमध्ये आरोपी सापडल्याचे प्रमाण केवळ ८ टक्के आहे. धक्कादायक बाब म्हणजे यामध्ये आमदारांनी अवघे २९ प्रश्न अधिवेशनात विचारले आहेत. त्यामुळे लोकप्रतिनिधीही याबाबत सजग नसून त्यांचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.

# रेवड्यांची खैरात

पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांच्या निमित्ताने काँग्रेस, भाजपा, बीआरएस आदी पक्षांनी आपले निवडणूक जाहीरनामे घोषित करताना मोफत सेवा आणि सवलतींच्या घोषणांचा अक्षरशः वर्षाव केला आहे. मतदारांवर प्रलोभनांचा वर्षाव करायचा, हेच चित्र राज्यातील निवडणुकांच्या निमित्ताने विशेषतः तेलंगणा व राजस्थानात दिसून आले.

तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्या नेतृत्वाखालील भारत राष्ट्र समितीने (बीआरएस) पक्षाने आपला पक्ष पुन्हा सत्तेवर आल्यास ४०० रुपयांत गॅस सिलिंडर व १५ लाख रुपयांपर्यंत औषधोपचार मोफत देण्याचे जाहीर केले आहे. बीआरएसने जाहीरनाम्यात राज्याचा अर्थसंकल्प ३ लाख कोटींपर्यंत नेण्याचा आमचा संकल्प आहे. राज्यात बीआरएसचे सरकार आल्यानंतर महिलांना दरमहा तीन हजार रुपये देण्यात येतील, असेही म्हटले आहे. रेशनवरील तांदळाचा कोटा वाढविण्याचेही प्रलोभन बीआरएसने दाखवले आहे. तेलंगणामध्ये काँग्रेस पक्षाने आपला पक्ष सत्तेवर आल्यानंतर पाचशे रुपयांत गॅस सिलिंडर देऊ असे म्हटले आहे. तसेच महिलांना मोफत बस प्रवास, २०० युनिटपर्यंत वीज मोफत, इंदिराम्मा भेट योजनांतर्गत हिंदू मुलींना विवाहाच्या वेळी १ लाख रुपये व १० ग्रॅम सोने, अल्पसंख्याक समाजातील मुलींना विवाहाच्या वेळी १ लाख ६० हजार रुपये देण्याचे आश्वासन काँग्रेसने दिले आहे. उच्च शिक्षण प्राप्त करणाऱ्या मुलींना मोफत स्कूटी देणार, तेलंगणा आंदोलनातील कार्यकर्त्यांवरील गुन्हे काढून घेणार, शेतकऱ्यांचे एक लाखापर्यंतचे कर्ज माफ तसेच शेतकऱ्यांना २० लाखांपर्यंत व्याजमुक्त कर्ज देण्याचे आश्वासन तेलंगणात काँग्रेसने दिले आहे.

तेलंगणात भाजपाने आपण सत्तेवर आल्यावर धर्माच्या आधारित दिलेले आरक्षण रद्द करू असे म्हटले आहे. राज्यात समान नागरी कायदा लागू करण्यात येईल, तेलंगणातील ज्येष्ठ नागरिकांना रामलल्लाचे दर्शन मोफत घडविण्यात येईल, उज्ज्वला योजनेतील लाभार्थींना दरवर्षी चार गॅस सिलिंडर मोफत, कॉलेजमधील विद्यार्थांना लॅपटॉप मोफत, मुलीच्या नावावर ती जन्मताच दोन लाखांची मुदत ठेव, ती २१ वर्षांची झाल्यावर त्याची रक्कम परत मिळेल, अशी आश्वसाने दिली आहेत.

आसामचे मुख्यमंत्री व भाजपाचे नेते हिमंता बिस्व सरमा हेही तेलंगणात प्रचाराच्या मैदानात उतरले होते. त्यांच्या तडाखेबंद भाषणांनी भाजपाचे हितचिंतक खूश झाले. तेलंगणात भाजपाची सत्ता आल्यावर अवघ्या तीन मिनिटांत हैदराबादचे नामांतर भाग्यनगर करण्यात येईल, असे जाहीर केले. अयोध्येत राम मंदिर उभारले गेले ते केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदींमुळेच, पंडित जवाहरलाल नेहरू किंवा इंदिरा गांधी यांची राम मंदिर उभारण्याची हिम्मत तरी होती का? असा प्रश्न त्यांनी विचारला. ज्या वेळी भारतावर शेजारी देशांच्या मदतीने दहशतवादी हल्ला झाला तेव्हा काँग्रेस सत्तेवर असताना बचावात्मक भूमिका घेतली जात असे, मात्र नरेंद्र मोदी सत्तेवर आल्यानंतर जेव्हा दहशतवादी हल्ला झाला, तेव्हा भारताने सर्जिकल स्ट्राईक करून सडेतोड प्रत्युत्तर दिले असे सरमा यांनी प्रत्येक ठिकाणी सांगून भाजपाविषयी लोकांमध्ये विश्वास निर्माण केला. राहुल गांधी व प्रियंका वड्रा हे एका शब्दानेही हमासचा उल्लेख करीत नाहीत, याकडेही सरमा यांनी मोठ्या खुबीने मतदारांचे लक्ष वेधले. एआयएमआयएमला पॅलेस्टाइनविषयी एवढे प्रेम असेल, तर त्यांनी तिकडे जाऊन त्यांचे समर्थन करणारी भूमिका मांडावी असेही त्यांनी असदुद्दीन ओवेसी यांना आव्हान दिले. एकीकडे मतदारांवर आश्वासनांची खैरात व दुसरीकडे तडाखेबंद प्रचार अशा दोन्ही आघाड्यांवर भाजपाने तेलंगणाची निवडणूक लढवली.

राजस्थानात काँग्रेस पुन्हा सत्तेवर आल्यावर जातीनिहाय जनगणना करण्याचे आश्वासन पक्षाने दिले आहे. भाजपाने मात्र या मुद्द्यावर आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही. काँग्रेसने म्हटले आहे की, गृहलक्ष्मी हमी योजनेखाली प्रत्येक घरातील प्रमुख महिलेच्या खात्यात दरवर्षी दहा हजार रुपये जमा केले जातील. गोवंश पाळणाऱ्यांकडून सरकार प्रति किलो २ रुपये या दराने शेण खरेदी करील, सरकारी कॉलेजमध्ये पहिल्या वर्षाच्या विद्यार्थिनींना लॅपटॉप मोफत दिले जातील, नैसर्गिक संकटाने पीडित परिवाराला १५ लाखांपर्यंत विमा कवच, प्रत्येक विद्यार्थ्याला इंग्रजी माध्यमातून शिक्षणाची हमी, राजस्थानातील १ कोटी ४ लाख परिवारांना ५०० रुपयांत गॅस सिलिंडर तसेच उज्ज्वला बीपीएल परिवारातील कुटुंबांना ४०० रुपयांत गॅस सिलिंडर, सरकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना जारी, अशी प्रलोभने काँग्रेसने आपल्या मतदारांना दाखवली आहेत. काँग्रेसने दिलेली आश्वासने समाजातील सर्व लोकांना लाभदायक आहेत, असा दावा केला आहे. काँग्रेसने चार लाख सरकारी नोकरींसह १० लाख जणांना नोकऱ्या देण्याचा वादा आपल्या घोषणापत्रात केला आहे. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत यंदा राजस्थानमध्ये एक कोटी युवा मतदार असे आहेत की, त्यांना पहिल्यांदा किंवा दुसऱ्यांदा मतदान करण्याचा हक्क प्राप्त झाला होता. रोजगार ही युवकांची सर्वात मोठी गरज लक्षात घेऊन काँग्रेसने १० लाख नोकऱ्या देण्याचे प्रलोभन दाखवले आहे. काँग्रेसची सारी मदार मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांचा चेहरा व त्यांनी पाच वर्षांत केलेला कारभार यावर आहे.

राजस्थानमध्ये भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, प्रदेशाध्यक्ष सी. पी. जोशी व माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे यांनी पक्षाचे घोषणापत्र जारी केले. गेल्या पाच वर्षांत काँग्रेसच्या कारकिर्दीत परीक्षांच्या पेपर फुटीच्या अनेक घटना घडल्या. वयोवृद्धांना निवृत्तिवेतन देण्यात मोठे घोटाळे झाले, केंद्राच्या जल जीवन मिशन योजना राबवतानाही घोटाळे झाले. राज्यात भाजपा सत्तेवर आल्यावर या सर्व घोटाळ्यांची एसआयटी (विशेष चौकशी पथक) नेमून चौकशी करील, असे भाजपाने म्हटले आहे.

राजस्थानात गेल्या पाच वर्षांत परीक्षांच्या पेपर फुटीच्या वारंवार घटना घडल्या. त्यामुळे जनतेत संताप आहे. जनतेचा रोष या निवडणुकीत काँग्रेसला धडा शिकवेल, असा भाजपाला विश्वास आहे. पेपर फुटीचा मुद्दा भाजपाने सतत मांडला. एसआयटी चौकशी झाल्यावर पेपर फुटीमागील सत्य उजेडात येईल, असे भाजपाला वाटते.पंतप्रधान किसान निधी योजनांतर्गत केंद्र सरकारकडून दरवर्षी शेतकऱ्यांना सहा हजार रुपये दिले जात आहेत. राजस्थानात निवडणूक प्रचारातच ही रक्कम वाढवून १२ हजार रुपये करण्याची घोषणा झाली. गेल्या पाच वर्षांत कर्ज फेडू न शकल्यामुळे राजस्थानातील १९४२२ शेतकऱ्यांवर जमिनीचे लिलाव करण्याची पाळी आली. त्यांना मदत देण्याची घोषणाही भाजपाने केली आहे. राज्यातील आठ कोटी लोकांपैकी सहा कोटी म्हणजे ७५ टक्के जनसंख्या ही शेतीवर अवलंबून आहे. शेतकरी व त्यांच्या परिवाराला मदत करण्याची घोषणा भाजपाने करून शेतकरी मतदारांना आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न केला.

काँग्रेस व भाजपा दोन्ही पक्षांनी युवा मतदारांना आकर्षित करण्यासाठी नोकऱ्या व रोजगार देण्याच्या घोषणा केल्या. भाजपाने अडीच लाख युवकांना सरकारी नोकऱ्या व रोजगार देण्याची घोषणा केली आहे, तर काँग्रेसने आपल्या घोषणापत्रात ४ लाख नोकऱ्या व रोजगार देणार असल्याचे म्हटले आहे. काँग्रेस व भाजपाने घोषणापत्रात महिला सक्षमीकरणावर भर दिला आहे. काँग्रेसने गृहलक्ष्मी योजनांतर्गत प्रत्येक गृहिणीला वर्षाला १० हजार रुपये आर्थिक सहाय्य देणार असे म्हटले आहे, तर भाजपाने प्रत्येक नवजात बालिकेच्या नावावर दोन लाखांचा बॉण्ड देणार असे वचन दिले आहे. काँग्रेस गरीब महिलांना ४०० रुपयांत गॅस सिलिंडर देणार आहे, तर भाजपाने ४५० रुपयांत सिलिंडर देऊ, असे म्हटले आहे.

महिलांच्या सुरक्षा व्यवस्थेसाठी प्रत्येक पोलीस ठाणे अंतर्गत अँटी रोमिओ स्क्वाड स्थापन करणार असल्याचे आश्वासन भाजपाने दिले आहे. महिला मतदारांची संख्या ४९ टक्के आहे म्हणून महिलांना आकर्षित करणाऱ्या अनेक घोषणा दोन्ही पक्षांच्या निवडणूक जाहीरनाम्यात वाचायला मिळतात. काँग्रेसने राजस्थानात पाच वर्षांत १२०० इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरू केल्या. त्यापूर्वी सत्तेवर असलेल्या भाजपाने १५० विवेकानंद मॉडेल स्कूल सुरू केले. यावेळी सत्तेवर आल्यानंतर चारशेपेक्षा जास्त पीएम श्री स्कूल सुरू करण्याचा वादा भाजपाने केला आहे. देशातील मोठ्या शहारात नोकरी मिळवायची, तर इंग्रजी यायला हवेच, हे लक्षात घेऊन इंग्रजी माध्यमांच्या शाळांवर राजकीय पक्ष भर देत आहेत. उज्ज्वला गॅस, पीएम निवास, स्वच्छता गृहे, गरिबांना मोफत रेशन अशा योजनांमुळे गरीब मतदार भाजपाकडे आकर्षित झालेला दिसतो, त्याचे फलित हे मतमोजणीच्या दिवशी समजू शकेल.

**- स्टेटलाइनः डॉ. सुकृत खांडेकर**

# संविधानातील अधिकार आणि कर्तव्ये

१) समानतेचा अधिकार - कलम-१२ ते १८

कोणत्याही नागरिकाला धर्म, वंश, जात, लिंग व प्रांत या कारणावरून भेदभाव करण्यास मनाई आहे. तसेच नियुक्तीच्या संबंधी सर्व नागरिकांना (स्त्री-पुरुष) समान संधी द्यावी यामध्ये भेदभाव नसावा. तसेच कलम-१५ हे दलितांच्या अत्याचाराविरुद्धचे कलम आहे. यामध्ये अस्पृश्यता पाळणे हा या कलमाने दंडनीय गुन्हा आहे.

२) स्वातंत्र्याचा अधिकार - कलम १३-२२

प्रत्येक व्यक्तीला भाषण/अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. तसेच सभा व संघटना करण्याचे, शांततेने एकत्र राहण्याचे स्वातंत्र्य व सार्वजनिक ठिकाणी मुक्त संचार करण्याचे स्वातंत्र्य उदा.- दुकाने, हॉटेल्स, चित्रपटगृहे, मॉल इ. आणि प्रत्येक व्यक्तीला कोणताही व्यापार व व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य हे सर्व या कलमात समाविष्ट आहे.

३) शोषणाविरुद्ध संरक्षण - कलम २३ व २४

यामध्ये बालमजुरी करण्यास निर्बंध व मानवी तस्करीपासून संरक्षण किंवा वेठबिगार, महिला व मुलींची अनैतिक वाहतूक करण्यास निर्बंध करणे.

४) धार्मिक स्वातंत्र्य - कलम २५ ते २८

प्रत्येक नागरिकाला कोणत्याही मंदिरात प्रवेश मिळू शकतो. तसेच पूजा व धम्माचे आचरण करण्याचे स्वातंत्र्य.

५) अल्पसंख्यांक व शैक्षणिक संरक्षण - कलम २९ व ३०

अल्पसंख्याक एस.सी, एस.टी., ओबीसी, एनटी,डी.एनटी यांना स्कॉलरशिप, फ्रीशिप, रिझर्वेशनमध्ये संरक्षण तसेच स्वतःच्या शिक्षण संस्था स्थापण्याचे स्वातंत्र्य.

६) संविधानिक प्रतिकाराचा अधिकार (तक्रारीचा अधिकार) कलम ३२ - ३५

संविधानामध्ये आपल्याला जे मूलभूत अधिकार दिलेले आहेत, त्या मूलभूत अधिकारांचे जर हनन होत असेल किंवा आपले मूलभूत अधिकार जर पायमल्ली तुडविले जात असतील, तर त्या व्यक्तीस कलम-३२ नुसार सर्वोच्च न्यायालयामध्ये दाद, न्याय मागता येते किंवा फिर्याद देता येते. (कलम २१४ ते २३१ यामध्ये उच्च न्यायालयाच्याबाबत तक्रार करू शकतो. तसेच कलम ३२ मध्ये मालमत्तेचा अधिकार वगळून कलम-४४ घटनादुरुस्तीनंतर तो कायदेशीर मालमत्तेचा अधिकार म्हणून त्याची नोंद करण्यात आली. हे सर्व अधिकार व हक्क डॉ. आंबेडकरांनी संविधानामध्ये सर्वांना दिले.




आपण जेव्हा एखाद्या अधिकाराबद्दल व हक्काबद्दल बोलतो, तेव्हा आपल्याला त्याची कर्तव्येही पार पाडावी लागतात. हक्क व कर्तव्य ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. ते परस्परांस पूरक आहेत. आपण नागरिकांचे अधिकार व हक्क समजावून घेतले, आता कर्तव्ये पाहू.

भारतीय नागरिकांची मूलभूत कर्तव्ये :

प्रत्येक नागरिकाने संविधानातील मानवी कर्तव्याचे पालन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. ही कर्तव्ये कलम-५१ मध्ये समाविष्ट आहेत.

१) भारतीय संविधानाचे पालन करणे. राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करणे.

२) भारताची सार्वभौमता, एकता, एकात्मता उन्नत ठेवणे व त्याचे संरक्षण करणे.

३) देशाचे संरक्षण करणे व आवाहन केले जाईल, तेव्हा राष्ट्रीय सेवा बजावणे.

४) भारतात सामंजस्य व बंधुभाव वाढीस लावणे. धर्म, भाषा, प्रांत, वर्ग यापलीकडे जाऊन समानता टिकविणे.

५) संस्कृतीच्या वारसाचे मोल जाणून त्याचे जतन करणे.

६) पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे. नद्या, सरोवरे व वन्यजीवसृष्टीचे संरक्षण करून त्यात सुधारणा करणे.

७) प्राणीमात्रांवर दया करणे. ८) स्त्रियांचा आदर करणे.

९) मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावादी, संशोधक बुद्धी यांचा विकास करणे. उदा. अंधश्रद्धा प्रतिबंध.

१०) सार्वजनिक व करमणुकीच्या मालमत्तेचे रक्षण करणे व हिंसाचाराचा त्याग करणे. उदा. रास्तारोको, तोडफोड इ.

११) राष्टाची प्रगती करणे यासाठी व्यक्तिगत व सामुदायिक उपक्रम राबविणे व यश मिळविणे.

१२) माता-पित्यांनी ६ ते १४ वर्षांपर्यंत आपल्या अपत्याला शिक्षणाची संधी प्राप्त करून देणे. या सर्व कर्तव्यांचे पालन झाले नाही, तर भारतीय संविधानास अभिप्रेत असलेले सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य प्रस्थापित होणार नाही. सद्यपरिस्थितीत सर्वत्र या कर्तव्यांचा अभाव दिसून येतो. याला सर्वस्वी आपण सर्व जबाबदार आहोत. कारण आपल्यामध्ये हिंसा, द्वेष, अत्याचार यांच्यात वाढ झालेली दिसते. हो, सध्याची देशामधील वास्तवता आहे.

संविधान समारोपावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या भाषणात म्हणाले होते की, घटनेचे गुणावगुण काय आहेत, याबद्दल मी ऊहापोह करीत नाही. संविधान कितीही चांगले असले तरी ते शेवटी वाईट ठरते. याचे कारण असे की, ते संविधान राबवणारे लोक नादान असतात अन् संविधान कितीही वाईट असले तरी ते शेवटी चांगले ठरते. याचे कारण असे की, ते संविधान राबवणारे लोक शहाणे असतात. संविधानाचा सुकरपणा त्याच्या स्वरूपावर कायदेमंडळ, अंमलबजावणीचे खाते आणि न्याय खाते हे राज्यकारभाराचे हत्यार होत. फक्त हीच हत्यारे देशाला पुरवू शकते. ही हत्यारे कशी वापरायची व चालवायची व त्यांचा लोककल्याणासाठी कधी व कसा उपयोग करायचा, हे भारतीय लोकांनी व राजकीय पक्षांनी ठरवायचे असते.

हे भारतीय लोक व राजकीय पक्ष भावी काळात कसे वागतील, हे मला कोण सांगू शकेल? आपले उद्धिष्ट साध्य करण्यासाठी ते सनदशीर मार्गाचा की क्रांती मार्गाचा अवलंब करतील? ते जर क्रांती मार्गाचा अवलंब करतील, तर संविधान कितीही चांगले असले तरीही ते कुचकामीच ठरून जाईल, हे सांगण्यास एखाद्या ज्योतिषाची जरुरी नाही. म्हणून मला असे वाटते की, भारताचे लोक व राजकीय पक्ष हे भविष्यकाळात कोणती भूमिका स्वीकारणार आहेत, हे लक्षात न घेता संविधानासंबंधी मत व्यक्त करणे व्यर्थ होय. तर आपण डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचे आचरण करून संविधानशील बनून एक जबाबदार नागरिकाची कर्तव्ये पार पाडू हेच देशप्रेम!! **समाप्तः**

**- प्रा. डॉ. यशोधरा वराळे**


## शब्दकोडे-२४३

**आडवे शब्द**

१. याचेच होते फुलपाखरू ४. डोंगरातील खाचाखोचा ७. मधमाशी (संस्कृत) १०. चविष्ट ११. जास्वंदीचा मूळ रंग १२. भांडण १३. बालिश, अपरिपक्व १५. पातळ खांब १७. दृष्टीभेट २०. 'सुवर्णा' याअर्थी मुलींचे एक नाव २१. शूर २३. बटाट्याचा सर्वपरिचित पण भाजणीचाही चांगला २४. मालक २५. पर्वा २६. चर्चा २८. खोडकर २९. नाजूक ३१. सोनेरी हरीण ३३. चेहऱ्यावरील तेज ३४. सत्व ३६. हिरवे ३७. गरजू ३९. गर्व म्हणजे थोडक्यात याची बाधा! ४०. समुद्र ४२. मुलगी ४३. निर्धन ४५. किल्ली, खटका ४६. प्रचंड, भारी ४८. जनन ४९. शारीरिक वा मानसिक वेदनेने अस्वस्थ होणे ५१. प्रामाणिक ५३. युद्धक्षेत्र ५५. पंकज ५६. अतिशय कृश माणसाला दिली जाणारी 'मत्स्याहारी' उपमा ६०. काढलेली सुट्टी ६१. मामाची बायको ६२. जगरूढी ६४. तमाशातील कलाकार ६७. श्वापद ६९. गोडी ७१. कांद्याचे पान ७२. मूळ अर्थ परवानगी, आता सुट्टी! ७३. प्रहार, आघात ७५. याचे चक्र कधीही उलट फिरवता येत नाही ७६. हळदीचा अधिक उष्ण व सुगंधी प्रकार ७७. गीत गायन ७८. कायदेशीर ८१. गवत ८३. जवळीक, घनिष्ठ संबंध ८४. अथर्वशीर्ष इ. गणपती स्तवन ८५. उलट, विरुद्ध

**उभे शब्द**

२. फसविणारा ३. प्रफुल्लित ४. उसाचे आडवे तुकडे ५. विद्या ६. संगोपन ७. कामदेव ८. देव्हारा ९. कर्णोपकर्णी १२. वाहणारी हवा १३. पूर्वीच्या 'बघण्याच्या' कार्यक्रमातील पदार्थ १४. ठाकरे परिवाराने चालवलेला खोपोली येथील वृद्धाश्रम १६. धोक्याचा इशारा १८. चित्रकलेचे रंग तयार करण्यासाठी फक्त याचेच तेल वापरतात १९. वजनदार २२. रमापती २४. टक्कर २६. पण-परंतु (हिंदी) २७. चलाख, हुशार २९. काळा असला तरी उगाळून संपतो! ३०. उत्कर्षाचा काळ ३२. शिकार ३५. नटवणे ३८. बंगाल ४१. हत्ती ४२. हात धुण्याचे पात्र ४४. भक्कम, मजबूत ४५. मुंबईची ओळख असणारा वास्तुप्रकार ४७. प्रवासी पोळी, दसऱ्याची तिथी ४८. शेजारी शेजारी ५०. तारेवरची तारांबळ ५१. सामोपचार ५२. असा आनंद चांगला नाही! ५४. मौज करणे ५५. अंगरखा ५७. काटकसर ५८. कापसाचे फळ ५९. न्यारी चव ६३. पुरुष ६५. शिक्षा ६६. पाठवणी ६८. पाठ फिरवणे ७०. च्या बरोबर ७१. रस्त्यावर पहिला हक्क यांचा ७४. दात ७७. थंड ७८. बोच, ठणका ७९. ढीग ८०. पुढे 'शास्त्र' जोडल्यास फसवेगिरीच अधिक! ८२. रात्र, रजनी



### शब्दकोडे-२४२ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.वजनदार ५.चेक ७.सोडत ९.अतर ११.खारट १२.पाटा वरवंटा १४.रत १५.छटाक १६.घमघमाट १९.रजक २१.पदभ्रमण २४.वनवास २६.पाडाव २८.मद २९.जांघ ३०.कानन ३२.परतपरत ३५.वीज ३८.शर ३९.कानस ४०.करतलभिक्षा ४१.मखर ४२.नामवंत ४५.ख ४६.भास ४८.गडबडणे ४९.विनवणी ५१.सटरफटर ५४.बाका ५५.सामान ५६.लव ५८अ.बार ५९.तीळ ६०.राधा ६२.कारण ६४.सीमा ६५.सानविवि ६७.आई-वडील ७०.गूढ ७१.रकाना ७२.रविवासर ७३.हनन ७४.रश ७५.खासी ७६.माहितगार ७९.घोस ८१.एकक ८२.धार ८३.गरम ८४.तांडेल

**उभे उत्तर**

१.वखार २.जरतर ३.नट ४.रपाटा ५.चेव ६.करवंद ७.सोटा ८.तलम ९.अवमान १०.रब्बी १३.टाक १५.छकडा १६.घण १७.घवघवीत १८.टवाळ २०.जपान २१.पसंत २२.भ्रमर २३.मदत २५.प्रकाश २७.वपन ३१.नरम ३३.रसना ३४.पतवंड ३६.जलयान ३७.शिक्षा ३९.कारभार ४०.कढणे ४३.मगर ४४.तबला ४७.सफल ४९.विकार ५०.वरातीमागून घोडे ५१.समाधानकारक ५२.टन ५३.टवका ५४.बाबागाडी ५५.सारासार ५७.गौण ५८.अंगाई ६१.रवि ६३.रहिवासी ६६.विनाशक ६७.आरमार ६८.वसंत ६९.लहर ७२अ.विखार ७७.हिम ७८.गाय ८०.सल

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय**- बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# शिरपूर तालुक्यातील ११८ ग्रामपंचायती ऑफलाईन..!

## 'संगणक परिचालकांचा विविध मागण्यासाठी बेमुदत संप'

**वरुळ । प्रतिनिधी**

शिरपूर तालुक्यात सुमारे १४७ गावे असून ११८ ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गावागावात विकास गाडा सुरू आहे. शासनाने ग्रामस्थांना अत्याधुनिक सुविधा देण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीला इंटरनेट जोडून विविध प्रकारचे दाखले व ग्रामपंचायत स्तरावरील नमुने ऑनलाईन केले आहे. मात्र हे काम करणाऱ्या संगणक परिचालकाला तुटपुंज्या मानधनावर काम करावे लागत असल्याने संगणक परिचालकाने विविध मागण्यासाठी बेमुदत संपाचा हत्यार उपसले आहे. त्यामुळे तालुक्यातील ११८ ग्रामपंचायती ऑफलाईन झाल्या आहे.

शिरपूर तालुक्यातील ११८ ग्रामपंचायतीत १०० संगणक परिचालक कार्यरत आहे. ग्रामविकास व माहिती तंत्रज्ञान विभागाच्या माध्यमातून सुरु असलेल्या पुर्वीच्या संग्राम व सध्याच्या आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पात मागील १२ वर्षापासून



**संगणक परिचालकावर ग्रामीण भागात एका पाठोपाठ एक कामाची जबाबदारी वाढतच चालली आहे. त्या तुलनेत तूटपंजे मानधन मिळत आहे. त्यातपुन्हा चुकीची टारगेट पद्धत व अनेक ठिकाणी १ ते ३३ नमुने उपलब्ध नाहीत. अशा विविध मागण्यासाठी आम्ही बेमुदत संप पुकारला आहे. शासनाने आमच्या मागण्या तात्काळ मान्य कराव्यात.**

**- तुषार पाटील, तालुकाध्यक्ष, संगणक परिचालक संघटना शिरपूर**

### नागरिकांची कामे खोळंबली

**तालुक्यातील ग्रामपंचायतीतून ग्रामस्थांना विविध प्रकारचे ऑनलाइन दाखले संगणक परिचालकाच्या माध्यमातून दिले जाते. मात्र संगणक परिचालक त्यांच्या विविध मागणीसाठी बेमुदत संपावर असल्यामुळे नागरिकांना जन्म - मृत्यु प्रमाणपत्र, विवाह प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र ,उत्पन्न प्रमाणपत्र आदी दाखले मिळत नसल्याने नागरिकांची अडचण निर्माण झाली आहे. या प्रमाणपत्र अभावी नागरिकांचे शासकीय व निमशासकीय कामे खोळंबली आहे.**

ग्रामपंचायत स्तरावर ग्रामविकास विभागाने नेमून दिलेले काम हे संगणक परिचालक करीत आहेत. वर्षानुवर्षे शासन यांच्या मागणीकडे दुर्लक्ष करीत असून यांना मजुरा पेक्षाही कमी मानधन मिळते. ग्रामीण भागातील जनतेला विविध प्रकारच्या सेवा देण्याचे काम संगणक परिचालक अविरतपणे करीत आहेत. ग्रामपंचायतचे ऑनलाईन ऑफलाईन काम व इतर अनेक प्रकारची कामे प्रामाणिकपणे करुन सुद्धा महागाईच्या काळात केवळ सहा हजार नऊशे रुपये देण्यात येतात. यात कुटुंब कसे चालवायचे असा प्रश्न या कर्मचाऱ्यांनी उपस्थित करून मागण्या मान्य होईपर्यंत बेमुदत संप पुकारला आहे.

या मागण्यासाठी बेमुदत संप

सध्या ग्रामविकास विभागास जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या अभिप्राया नुसार ग्रामपंचायतच्या सुधारीत फाईल वित्त विभागास त्वरित पाठवून संगणक परिचालकांना कर्मचारी दर्जा व किमान वेतन देण्यात यावे. कर्मचारी दर्जा व किमान वेतन मिळेपर्यंत वीस हजार रुपये मासिक वेतन देण्यात यावे. नव्याने सुरु करण्यात आलेली चुकीची टारगेट सिस्टम रद्द करण्यात यावी. पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या जुन्या संगणक परिचालकांना नियुक्ती देण्यात यावी. नियुक्ती झालेल्यांना न मिळालेले मानधन त्वरित देण्यात यावे.

## नैताळे येथे घायाळ परिवाराने केले वाजत गाजत कन्येचे स्वागत



**नाशिक ।** मुलगी झाली म्हणून बेवारस टाकून दिल्याच्या अनेक घटना आपण नेहमी ऐकत असतो.स्त्री पुरुष समानतेविषयी अनेक वेळा बोलले जात असले तरी अजूनही अनेक समाजात मुलगा व मुलगी यात भेदभाव केला जातो.परंतु नैताळे येथील गोविंद दगडू घायाळ यांनी आपल्या नातीचे ढोल ताशाच्या गजरात वाजत गाजत स्वागत करून मुलगा व मुलगी सारखीच असल्याचे समाजाला दाखवून दिले आहे. नैताळे येथील शेतकरी गोविंद दगडू घायाळ यांचा मुलगा रोहित गोविंद घायाळ हा दिल्ली येथे आयटी. इंजिनियर असून त्याची पत्नी प्रियांका रोहित घायाळ यांनी तीन महिन्यापूर्वी कन्येला जन्म दिला होता.त्या कन्येचे नाव सौम्या रोहित घायाळ असे ठेवण्यात आलेले आहे.माहेर असलेल्या रुई तालुका निफाड येथून सौम्याला नुकतेच नैताळे येथे आणण्यात आले. त्यावेळी घायळ परिवाराने आपल्या घरावर विद्युत रोशनी करून रांगोळी व फुलांची सजावट करून ढोल ताशांच्या गजरात वाजत गाजत सौम्या व तिच्या आईचे आजी सरला घायाळ यांनी औक्षणे करून. गृहप्रवेश करण्यात आला.कन्याच्या अशा या आगळ्यावेगळ्या गृहप्रवेशाची अनेकांनी स्वागत केले आहे.

मानवाने चंद्रावर प्रवेश केला आहे.अनेक क्षेत्रात मुलगी मुलांच्या पुढे पाऊल ठेवत आहे. त्यामुळे मुलगा व मुलगी असा भेदभाव न करता दोघांनाही समान वागणूक दिली पाहिजे.मुलीला सुद्धा वंशाचा दिवा मानले पाहिजे.

**- गोविंद दगडू घायाळ(आजोबा)**

## आ.गोपीचंद पडळकर यांचे बोलवते धनी कोण?

### वादग्रस्त विधान करून जाती जातीत भांडण लावून जातीय तेढ निर्माण करू नये: करण गायकर यांचा इशारा

**नाशिक । प्रतिनिधी**

आ.गोपीचंद पडळकर यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनावर भाष्य करतांना जातीय तेढ निर्माण करणारी वक्तव्य करून जाती जातीत भांडणे लावू नयेत असा इशारा छावा क्रांतीवीर सेनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांनी दिला आहे. त्यांचे बोलवते धनी कोण आहेत याचीही समाजाला कल्पना असल्याचे करण गायकर यांनी म्हटले आहे.

करण गायकर यांनी दिलेल्या इशारा निवेदनात म्हटले आहे की, मराठा समाजाच्या हक्काची लढाई महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाच्या माध्यमातून चालू आहे. उपेक्षित वंचित समाजाला न्याय मिळायला हवा, या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रेरणा ही या मराठा आरक्षणाच्या लढ्यामागे आहे. हे मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील वारंवार सांगतात. तरीही आ.गोपीचंद पडळकर हे फक्त राजकीय अभिनिवेश बाळगून जरांगे पाटील आणि एकूणच मराठा समाजाच्या विद्यमान आंदोलनाविषयी बोलत आहेत. पडळकर यांचा या मागचा बोलविता धनी कोण? या विषयी मराठा समाज चांगलाच जाणून आहे. त्यामुळे त्यांनी राजकीय हेतू बाजूला ठेवून या समाजाला कसा न्याय देता येईल ते पहावे. आपल्या ग्रामदैवताची खोटी शपथ घेणाऱ्या गोपीचंद पडळकर यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या सारख्या प्रामाणिक नेतृत्वावर आरोप करण्यापेक्षा स्वतः आत्मचिंतन करावे, आपण आपल्या जातीला न्याय देऊ शकलो नाही उलट त्यावर राजकीय पोळी भाजून आमदारकी भोगली, सत्तापद मिळविले. याउलट मराठा योद्धा जरांगे पाटील यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. मी कधीही राजकारणात जाणार नाही. राजकारणापासून दूर राहणार माझ्या समाजाला आरक्षण मिळावे ही माझी प्रामाणिक अपेक्षा आहे तीही लढाई लढताना मी कोणत्याही राजकीय पक्षांना व्यक्तींना सोबत घेऊन नव्हे तर सर्वसामान्य गोरगरीब मराठ्यांना सोबत घेऊन ही आरक्षणाची लढाई लढणार आहे कारण आरक्षण हे माझ्या गरीब मराठ्यांना पाहिजे. त्यासाठी ते महाराष्ट्रात दौरे करत असताना ज्या ज्या ठिकाणी थोर पुरुषांचे स्मारक असतील. पुतळे असतील त्या त्या स्मारकांना अभिवादन करत त्यांचे विचार आत्मसात करत मराठ्यांचा हा लढा लढत आहे. हे वास्तव लक्षात घेऊन गोपीचंद पडळकर यांनी बोलताना तरी आता आपल्या अकलेचे तारे तोडू नये अशी समज मराठा समाजाच्या वतीने देत असल्याचे करण गायकर यांनी इशारा निवेदनात म्हटले आहे.

धर्माला न दुखवता संविधानिक पद्धतीने आपल्या आरक्षणाची लढाई लढत आहेत त्याला साथ देता येत नसेल तर किमान विरोध करण्याचा धाडसही इतर नेत्यांनी करू नये. असा इशारा मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक छावा क्रांतिवीर सेनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांनी दिला आहे.

## भाजपा कार्यालयात भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन संविधान दिन साजरा

**नाशिक । प्रतिनिधी**




भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुजन करण्यात आले. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.

यावेळी भाजपा शहराध्यक्ष प्रशांत जाधव, सरचिटणीस सुनिल केदार, काशिनाथ शिलेदार, अनु.जाती मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष गणेश कांबळे, मध्य मंडल अध्यक्ष वसंत उशीर, उत्तमराव उगले आदी मान्यवरांच्या उपस्थितीत भाजपा कार्यालय वसंतस्मृती येथे कार्यक्रम संपन्न झाला. तसेच कार्यक्रमाच्या सुरुवातीला २६/१११ च्या दहशतवादी हल्यात शहिद झालेल्या वीर जवानांना व नागरीकांना श्रध्दांजली वाहण्यात आली. मध्य मंडल अध्यक्ष वसंत उशीर यांनी संविधानाचे वाचन केले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कुंदन खरे यांनी केले.

याप्रसंगी सरचिटणीस रोहिणी नायडू, अ‍ॅड.शाम बडोदे, नंदकुमार देसाई, रोहिणी रकटे, संगीता जाधव, कविता तेजाळे, राजेंद्र मोरे, गजानन रणबावळे, अनिल मोरे, मदन निकम, प्रविण नन्नावरे, अंबादास आहिरे, राम काळे, प्रदिप पाटील, ऋषिकेश डापसे, बाळासाहेब घुगे, विनायक कस्तुरे, नंदिनी रणबावळे, आरिफ काझी, राजु शेख, हिना शेख, देवेंद्र चुंभळे, विजय कुलकर्णी, धनंजय सोनवणे, सदानंद तायडे आदीसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## देश-विदेशातून आलेल्या ९० तज्ज्ञांनी परिषदेत केले मार्गदर्शन

**नाशिक । प्रतिनिधी**




इंडियन सोसायटी ऑफ क्रिटीकल केअर मेडिसिन (आयएससीसीएम) यांच्या नाशिक शाखेच्या वतीने आयोजित अकराव्या महाक्रिटीकॉन २०२३ या राज्यस्तरीय परीषदेचा समारोप रविवारी (२६ नोव्हेंबर) झाला. या तीन दिवसीय परिषदेत पार पडलेल्या कार्यशाळा आणि चर्चासत्रांतून ९० तज्ज्ञांनी आरोग्य सेवा दर्जेदार बनविण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले. राज्यभरातून ९०० हून अधिक डॉक्टरांनी परिषदेत सहभाग नोंदवत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

हॉटेल एक्स्प्रेस इन येथे झालेल्या या परीषदेत काल दिवसभर विविध विषयांवर सत्र पार पडले. यामध्ये डॉ.राहुल पंडित यांनी आयसीयुच्या गुणवत्तेत कशा प्रकारे सातत्याने सुधारणा करता येऊ शकते याविषयी मार्गदर्शन केले. तर डॉ.कपिल झिरपे यांनीही मार्गदर्शन करतांना आयसीयुमध्ये बाळगायच्या सावधगिरीविषयी संवाद साधला. अवयव प्रत्यारोपण व त्याविषयीची कायदेशीर क्लिष्टता, घ्यावयाची खबरदारी याविषयावरील सत्रात डॉ.राहुल पंडित, डॉ.खुसराव बजन, डॉ.आनंद निकाळजे, डॉ. वेंलेंटाइन लोबो यांनी सविस्तर माहिती दिली. सायंकाळी औपचारीक उद्घाटन समारंभाला पद्मश्री डॉ. अरविंदर सिंग सॉइन यांची प्रमुख उपस्थिती होती. सहभागी डॉक्टरांना मार्गदर्शन करतांना ते म्हणाले, भारतात प्रत्येक क्षेत्रात संशोधनाची आवश्यकता आहे. त्याप्रमाणे वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनात डॉक्टरांनी पुढाकार घ्यावा. संशोधनाला चालना देणारे अभ्यासक्रम विकसीत व्हावे. विशेषतः आपत्कालीन उपचाराच्या शाखेत देखील संशोधन करतांना नवनवीन गोष्टी अवगत करण्याचे आवाहन त्यांनी केले.

परीषदेच्या तिसऱ्या दिवशी रविवारी चंदिगढच्या पीजीआय या नामांकित संस्थेचे विभाग प्रमुख डॉ.आशिष भल्ला यांनी नाशिक क्षेत्रातील शेतकरी वर्गात उद्भवणारी विषबाधा ही व्याधी व त्यावरील आधुनिक उपचार यांविषयी सखोल मार्गदर्शन केले. यानंतरही विविध सत्रांमध्ये उपस्थित तज्ज्ञांनी सहभागी डॉक्टरांना त्या-त्या विषयात मार्गदर्शन केले. डॉ.शिला मयात्रा यांचीही परिषदेत विशेष उपस्थिती राहिली. 'कोलॅबरेटिव्ह ट्रासफॉर्मेशन इन क्रिटिकल केअर मेडिसिन' या संकल्पनेवर आधारित तीन दिवसीय परीषदेच्या कामकाजाचा आढावा आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ.यतिंद्र दुबे, आयोजन समितीचे सचिव डॉ. पंकज राणे यांनी घेतला. तसेच चांगला प्रतिसाद दिल्याबद्दल सर्व सहभागी डॉक्टरांचे आभार मानले. या परीषदेच्या संयोजनात आयएससीसीएम नाशिकचे अध्यक्ष डॉ. दिनेश वाघ, सचिव डॉ.रुचिरा खासणे, महाक्रिटीकॉनचे सायंटिफिक कमिटीचे अध्यक्ष डॉ. देवदत्त चाफेकर, खजिनदार डॉ.हितेंद्र महाजन, आयोजन समिती सदस्य डॉ.अभिनंदन मुथा, डॉ.भाविक शाह, डॉ.मकरंद राणे, डॉ.महेश बनसोड, डॉ.स्वप्निल साखला, डॉ.विकास कुशारे यांनी परीश्रम घेतले.

## जिजामाता कन्या विद्यालयाचा ३९ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**नाशिक ।** लासलगाव शिक्षण सहाय्यक मंडळ संचलित जिजामाता कन्या विद्यालयाचा ३९ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डी डी कुलकर्णी तर प्रमुख पाहुण्या म्हणून संस्थेच्या संचालिका पुष्पाताई दरेकर,नीता पाटील उपस्थित होते

वर्धानदिनानिमित्त शाळेचे सुशोभीकरण करण्यात आले होते.विद्यार्थिनींनी शाळेबद्दल आपल्या भावना मनोगतातून व्यक्त केल्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिजामाता कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका रोशनी गायकवाड यांनी केले तर लोकनेते दत्ताजी पाटील विद्यालयाचे प्राचार्य दत्तू गांगुर्डे यांनी मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या



## त्रिपुरारी पौर्णिमेला जोगेश्वरी माता येथे छप्पन्न भोग, शिव याग कार्यक्रम

**नाशिक । प्रतिनिधी**

कुलस्वामिनी श्री जोगेश्वरी माता मंदिर, बेटावड, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथे दि. २६ आणि २७ नोव्हेंबर रोजी शिवयाग व छप्पन भोग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या वर्षाचा मान नाशिक येथील दुसे परिवाराला मिळाला आहे.

या भव्य दिव्य सोहळ्यामध्ये नाशिक, धुळे, जळगाव, पुणे, मुंबई येथील जोगेश्वरी भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन दुसे परिवार व आयोजन समितीने केले आहे. या छप्पन भोग कार्यक्रमात सढळ हाताने आर्थिक मदत करण्याचे आवाहनही यावेळी आयोजन समितीने केले आहे.


प्रोसेस जमा | अ‍ॅड.श्री. अक्षय ए. सगर,साक्री

नि.६

**जाहीर नोटीस**

**साक्री येथील मे. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज क्र. ३९५/२०२३**

श्रीमती. लता अनिल भोये व इतर, उ.व.-५२, धंदा-घरकाम, राहणार-कुडाशी, ता. साक्री, जि. धुळे .....**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** ...**सामनेवाला**

मयत - कै. अनिल रेशमा भोये
(मृत्यू दि.-१२/०४/२०२१) ...**मयत**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, येथे दिनांक २३/११/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. अनिल रेशमा भोये यांचे दिनांक १२/०४/२०२१ रोजी निधन झाले आहे, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१. श्रीमती. लता अनिल भोये, २. श्रीमती. विजया धर्मा चौरे, ३. शेखर अनिल भोये, ४. लिना निलेश बहिरम, ५. भुषण अनिल भोये,

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय, निमशासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, साक्री कोर्ट क. २ यांचे न्यायालयात दिनांक १२/०१/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित अरण्यात येईल. सदर जाहिर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ-साक्री,
दिनांक - २४/११/२०२३ आदेशावरून

**क. लिपीक**
**कामगिरी कारकुन, साक्री** (शिक्का) **सहायक अधिक्षक, सह दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री**


# भारतात प्रथमच लॅसेर्टस सिंड्रोमचे निदान

### हॅंड सर्जन डॉ. गौरव पगारे यांचे आधुनिक तंत्राचे उपचार रुग्णांना वरदान

## युएसजी प्रणालीने हात शस्त्रक्रिया देशात प्रथमच नाशकात

**नाशिक । प्रतिनिधी**

सध्याच्या काळात असंख्य प्रकारतील अपघातांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे हाता-पायाचे फ्रॅक्चर होण्याच्या घटना देखील वाढल्या आहेत. त्याचप्रमाणे अन्यकारणाने शरिरातील अंगठे, बोटे, मनगट, कोपरा यांना दुखापत होणे, अर्धांग वायू, मज्जातंतू दुखापत यासारखे आजार होणे, यावर इलाज करणे आवश्यक असते. इतकेच नव्हे तर तुटलेले हात, संपूर्ण तुटलेली बोटे, तुकडा पडलेला पाय जोडण्याची यशस्वी सर्जरी करण्यात येते.



नाशिक मधील प्रसिद्ध हॅंड सर्जन डॉ. गौरव पगारे यांच्या गंगापूर रोडवरील गौरव हॉस्पिटल व पंचवटीतील द हॅन्ड क्लिनिकमध्ये खात्रीशीर इलाज तथा उपचार करण्यात येत असल्याची माहिती पत्रकार परिषदेत डॉ. गौरव पगारे यांनी दिली. हाताची शस्त्रक्रिया ही नवीन ॲडव्हान्स सुपरस्पेशालिटी शाखा असून हाताच्या मनगटाच्या आणि वरच्या अंगाच्या विविध समस्या हाताळताना अत्याधुनिक पाश्चात वैद्यकीय तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे.

डॉ. गौरव पगारे हे यांनी फ्रान्स देशातील पॅरीसच्या इंटरनॅशनल रिस्ट सेंन्टरकडून अलीकडेच प्रशिक्षण घेतलेले असून देशातील मोजक्या हॅंड सर्जनपैकी ते आहेत. विशेष म्हणजे त्यांनी भारतात प्रथमच युएसजी (सोनोग्राफी) मार्गदर्शित प्रणालीने हात शस्त्रक्रिया देखील भारतात प्रथमच सुरू केल्या आहेत. या पध्दतीची शस्त्रक्रिया कार्पल टनल सिंड्रोम, ट्रिगर फिंगर, अल्नार नर्व्ह एंट्रॅपमेंट, लॅसेर्टस सिंड्रोम आणि यासारख्या विविध आजारंवर उपचार करण्याचे कौशल्य डॉ.पगारे यांनी आत्मसात केले आहे.

डॉ. गौरव पगारे हे हाताच्या शस्त्रक्रियेचा इतिहास घडवत आहेत, वॉलान्ट तंत्राचा वापर करुन भारताच्या पहिल्या लॅसेर्टस सिंड्रोमचे युएसजी गायडेड टेक्निकने त्यांनी उपचार केले. यामुळे रुग्णांना चार ते पाच वर्षापासून असणारा त्रास १० ते १५ मिनिटात डॉ. पगारे यांनी घालविला. रुग्णांना आजारातून बाहेर पाडत त्वरित आराम देण्याचा त्यांचा उद्देश आहे. याआधी शस्त्रक्रियेसाठी काही तासांचा कालावधी लागायचा, तसेच शस्त्रक्रियेनंतर आरामासाठी ४ ते ५ दिवस किंवा १ ते २ आठवडे लागतात. मात्र गौरव हॉस्पिटल व द हॅन्ड क्लिनिकमध्ये शस्त्रक्रियेनंतर फक्त २४ तासांत रुग्णांना कामावर परत जाता येते. तसेच शस्त्रक्रियेचा कालावधी १० ते १५ मिनिटांपर्यंत लागतो.

सध्या गौरव हॉस्पिटल, जुनी पंडित कॉलनी, केटीएम कॉलेज समोर, गंगापूररोड येथे आहे. तर द हॅन्ड क्लिनिक शॉप नंबर २ तुलसी आर्केड, दिंडोरी नाका, खांदवे मिलजवळ, पंचवटी, नाशिक येथे आहे. डॉ. गौरव पगारे हे हात, मनगट व मायक्रोव्हसकुलर सर्जन, एमबीबीएस, ऑर्थो, हॅन्ड सर्जरी आहेत.

**न्यूज कॉलम**

### कुंभारी-पंचकेश्वर रस्त्यावर सव्वादोन लाख रुपये लुटले

धुळे । कुंभारी-पंचकेश्वर (ता. निफाड) रस्त्यावर रात्री झालेल्या लुटमारीत चोरटे दोन लाख २७ हजार रुपये घेऊन पसार झाले. वाटमारी चोरट्यांनी संबंधित व्यक्तीला जबर मारहाण केली. सोमनाथ मुरलीधर गिते (रा. पालखेड मिरचीचे) दिवसभरातील दुकानातील व्यवसायाची रोकड घेऊन रात्री साडेनऊला दुचाकीवरून कुंभारी-पंचकेश्वरमार्गे पालखेडला घरी जात होते. वाटेतील भवानी मंदिरात ते दर्शनासाठी थांबले असताना चेहऱ्यावर मास्क लावले दोन जण तेथे आले. गिते यांना दांड्याने मारहाण केली. त्यामुळे गिते खाली कोसळले. जखमी गिते यांनी मारेकऱ्यांशी झटापट केली. चोरटे गिते यांच्या डोक्याला पिस्तूल लावून त्यांच्याकडील दोन लाख २७ हजारांची रोकड घेऊन फरारी झाले. गिते यांच्यावर पिंपळगाव येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पिंपळगाव पोलिसांत गुन्हा दाखल झाला असून, पोलिस निरीक्षक अशोक पवार अधिक तपास करीत आहे.

# गोदावरी नदी निर्मळ, पवित्र ठेवू एवढी एकच दक्षिणा मला द्या!


## नदीकाठावरील कचरा संकलनाचा करा संकल्प; पं. मिश्रांचे आवाहन

धुळे । प्रतिनिधी

गोदावरी नदी आमची माता आहे. तिच्यापात्रात कोणी निर्माल्य टाकत असेल तर'त्याला', आमची गोदावरी पवित्र आहे,निर्माल्य टाकू नका, असे सांगा.निर्माल्याने पाणी दूषितहोते. हेदेखील एकलोटा जलसारखेच आहे.

आमची माता गोदावरी आम्ही प्रदूषितहोऊ देणार नाही, तीनिर्मळ-पवित्र ठेवू, नदी-तलाव-विहिरयापैकी कोठेही आम्ही निर्माल्य टाकणारनाही एवढीच दक्षिणा या नाशिकच्याभूमीवर आम्हाला द्या. आठवड्यात एकदिवस गोदावरीच्या काठावर जाईनआणि तेथे पडलेला कचरा उचलून एकाठिकाणी एकत्र करेन, असा नियम बनवा. हीदेखील शिवपूजाच आहे,अशी कळकळीची विनंती आंतरराष्ट्रीयकथाकार पंडित प्रदीप मिश्रा यांनीशनिवारी (दि. २५) श्री शिवमहापुराणकथेच्या समारोपप्रसंगी नाशिककरांना केले.

समारोपाच्या वेळी साडेसहालाखांपेक्षा जास्त भाविकांची विक्रमीगर्दी झाली होती.गेल्या पाच दिवसांपासून शहरातीलदोदे मळा येथे सुरू असलेल्या श्रीशिवमहापुराण कथेचा समारोप शनिवारीसकाळी झाला. पालकमंत्री दादा भुसे,आविष्कार भुसे, शिवसेनेचेजिल्हाप्रमुख अजय बोरस्ते,महानगरप्रमुख बंटी तिदमे यांच्यासहविविध पदाधिकारी या वेळी उपस्थितहोते. पं. मिश्रा म्हणाले की, 'शिव कृपाझाल्यानंतर आपण चांगल्या स्थानीपोहोचू शकतो. तिथे तुम्ही पोहोचलाततर तुमचा चांगला काळ भगवानशिवशंकर सुरू करतील.तुम्ही चांगल्या मार्गाकडे जात असालतर त्यात अनेक जण अडथळेआणतील, तुम्हाला कोणी ना कोणीथांबवेल, अडचणी आणतील. मात्र,तुम्ही थांबू नका. तेव्हा तुमचा भोळाशंकर तुमच्या पाठीशी नक्की उभाराहील. सनातन धर्म बदलून आमच्याधर्मात यावे आणि हा धर्म नष्ट व्हावाअशी अपेक्षा जगातील मेणबत्त्यालावणारे धर्म करत असतील तर तुम्हीयाचा विचार करायला हवा.'नाशिकमध्ये पशुपतिनाथाची पूजाकरणाऱ्या एका तरुणीने मंदिर बंदकरून ठेवल्याची तक्रार केली. तिचीचिठ्ठी वाचून दाखवत पं. मिश्रा म्हणालेकी, नागरिक विशेषत: तरुण-तरुणीसध्या मोठ्या संख्येने सनातन धर्माकडेवळत आहेत, अशा वेळी अशाप्रकारचे कृत्य निंदनीय आहे. सनातनधर्मासाठी मंदिराचे व्यवस्थापक,संचालक आणि ट्रस्टींनी याचागांभीर्याने विचार करावा, असे आवाहनकरतानाच जगातील कुठलीही व्यक्तीतुम्हाला त्रास देत असेल तर शिवशंकरतुम्हाला तुमच्या लक्ष्यापर्यंत पोहोचवतआहेत असे समजून होणाऱ्या त्रासाकडेदुर्लक्ष करा, असे आवाहन मिश्रा यांनीभाविकांना केले.



### धर्माला नावे ठेवणारी पिढी काय कामाची?

केवळ चित्रपट गाणी ऐकणारी,सनातन धर्माला नावे ठेवणारी अपत्येकधीच नको. कुंडली पाहणारे अनेकलोक असतील, पण कर्म पाहणारेफक्त शिव शंकरच आहेत. जिचाशंकरांवर विश्र्वास नाही अशी पिढीकाय कामाची?, असा प्रश्नही पं.प्रदीप मिश्रांनी विचारला.

### मुलाला व्यसनांपासून रोखता, पतीलाही रोखा

तुम्ही मुलाला तंबाखू, गुटखा खाण्यापासूनथांबवता, मग पतीला या व्यसनांपासून कारोखू शकत नाही?, पतीलाही रोखा, असासल्ला मिश्रा यांनी महिलांना दिला. जेवढेलहान होऊन जीवन जगाल तितके चांगलेजीवन जगाल. टीका होत असेल तर प्रगतीसुरू आहे असे गृहित धरा, अशी टिप्पणीही त्यांनी केली.



## आर.सी.पटेल माध्य. विद्यालयात संविधान गौरव दिवस साजरा

शिरपूर । प्रतिनिधी

आर.सी.पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात संविधान गौरव दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

भारतीय संविधानाबाबत जनजागृती व सर्व नागरिकांना संविधानाची ओळख व्हावी या उद्देशाने संविधान दिन साजरा करण्यात येतो. त्या अनुषंगाने भारतीय संविधान प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाचा आदर व नियमांचे पालन करण्याची शपथ घेतली. बी.व्ही.मोरे यांनी संविधान निर्मिती व त्याचे महत्व तसेच संविधानाचा अर्थ विद्यार्थ्यांना समजावून सांगितला. त्यानंतर २६/११ च्या झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या वीरांना श्रध्दाजंली देण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय संविधान निर्मिती मध्ये फार मोठे योगदान असल्यामुळे त्यांच्या प्रतिमेचे व भारतीय संविधान पुस्तिकेचे पूजन प्राचार्य पी.आर.साळुंखे व पर्यवेक्षक एन. ई. चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. प्राचार्य पी.आर साळुंखे यांनी विद्यार्थ्यांना भारतीय संविधाचे दैनंदिन जीवनातील महत्व सांगत भारतीय संविधानातील नियम व कर्तव्य यांचे पालन करण्याचे आवाहन केले. पर्यवेक्षक यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान निर्मितीतील कार्याची माहिती विद्यार्थ्यांना करून दिली. कार्यक्रमाला स्काऊट विभाग प्रमुख बी. व्ही. मोरे, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख बी. एन.अहिरे, एस. डी. गाडीलोहार, पी. वाय. शिरसाठ, एस. के.पाटील, एस. डी. पाटील, एन. के. देवरे, श्रीमती बी. आर. पाटील, पी. के. पाटील, श्रीमती सी. एस. पाटील, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



## विद्याधन महाविद्यालयात संविधान दिवस साजरा

धुळे । प्रतिनिधी

वलवाडी येथील विद्याधन महाविद्यालयात दि. २६ नोंव्हेबर २०२३ रोजी संविधान दिना निमित्त संविधान दिवस उत्सहात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डाँ. आर. बी. पवार यांनी संविधानाचे महत्व विषध केले या प्रसंगी विद्यापिठाच्या परिक्षा कामाकाजा निमित्त वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून उपस्थित डॉ. रमेश अहिरे व प्रा. अनिल पाटील यांनी भारतीय संविधान व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन केले. प्रा. अनिल पाटील यांनी भारतीय संविधान उद्देशीकेचे सार्वजनिक वाचन केले. तसेच मुंबई येथील दहशतवादी हल्ल्यात वीर मरण पावलेल्या जवानांना आणि नागरिकांना मानवंदना देऊन श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम आधिकारी डॉ. योगेश बोरसे यांनी केले. या प्रसंगी संस्थेचे सचिव श्री. हर्षल पाटील आणि शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



## निशाणे जि .प.शाळेत संविधान दिवस साजरा

चिमठाणे । प्रतिनिधी

शिंदखेडा तालुक्यातील निशाणे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत भारतीय संविधान दिवस मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच विध्यार्थ्यानी संविधानाचे वाचन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या वेळी शाळेचे मुख्याध्यापक धात्रक तसेच गावातील लोटन भाईजी, आनंदसिंग गिरासे, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## रोटरी क्लब धुळे क्रॉस रोड तर्फे रेटीनोपॅथी शिबीर संपन्न

### मधुमेही रुग्णांचा उत्तम प्रतिसाद

धुळे । प्रतिनिधी

विविध सामाजिक उपक्रमात सातत्याने अग्रेसर असलेल्या रोटरी क्लब धुळे क्रॉस व ज्योती नेत्र चिकित्सालय व फेको सेंटर धुळे तर्फे आज मधुमेही (डायबेटिक) रुग्णांसाठी मोफत रेटीनोपॅथी तपासणी शिबीराचे भव्य आयोजन डॉ ज्योती तिवारी यांच्या नेत्र चिकित्सालयात करण्यात आले होते.



मधुमेह असलेल्या रुग्णांना कालांतराने दृष्टीदोषाचा त्रास होतो हे टाळण्यासाठी अगोदरच उपाययोजना करुन औषधोपचाराने त्यांना उत्तम आरोग्य लाभावे या हेतूने शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. त्यास मधुमेही रुग्णांनी चांगला प्रतिसाद देऊन शिबीर यशस्वी केले. शिबिराचा औपचारिक शुभारंभ दिपप्रज्वलनाने करण्यात आला या प्रसंगी डॉ ज्योती तिवारी, रोटरी क्लब धुळे क्रॉस रोड अध्यक्ष दिपक अहिरे, प्रोजेक्ट चेअरमन दिनेश कुवर, सचिव सचिन बोरसे, डॉ सोहम तिवारी, डॉ विरेंद्र रोडा, दिनेश खंडीकर, मनोज चौधरी, कमर शेख, प्रा डॉ हितेंद्र पाटील, आशिष पटवारी, प्रशांत छाबडा, जतीन पांचाल, दिपक भावसार, संजय जैन, स्वप्नील गौड, आनंद कुलकर्णी आदी रोटरी क्लब सदस्य उपस्थित होते. या शिबिरात उपस्थित मधुमेही व उच्च रक्तदाब असलेल्या रुग्णांची अत्याधुनिक मशीन द्वारे नेत्र तपासणी करण्यात आली व दृष्टीदोष आढळलेल्या रुग्णांना वैद्यकीय सल्ला देण्यात आला. तसेच मधुमेही रुग्णांना शिबीरात अल्पोपाहार देण्यात आला. शिबीर यशस्वी करण्यासाठी रोटरी क्लब धुळे क्रॉस रोड पदाधिकारी व सदस्य यांनी परिश्रम घेतले.

## सत्यशोधक जन आंदोलन संघटना वतीने संविधान दिन साजरा

वरुळ । प्रतिनिधी

दि २६ नोव्हेंबर २०२३ व रोजी सत्यशोधक जन आंदोलन संघटनेने तऱ्हाडी वतीने येथे संविधान दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी उपसरपंच उज्जनबाई अहिरे, तंटामुक्त समिती अध्यक्ष तुळशीराम भामरे, मल्हार सेना जिल्हा अध्यक्ष सुनील पाकळे, ग्रामविकास अधिकारी देवीदास धांडे यांच्या हस्ते महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे



पूजन करून अभिवादन केले व संविधानाचे पूजन करण्यात आले.

भारतीय संविधान दिनानिमित्त भारतीय संविधानाविषयी जाणीव जागृती आणि भारतीय संविधानातील मुलतत्वांचा विद्यार्थ्यांनी जबाबदार सुजाण आणि सुसंस्कृत नागरिक होण्यासाठी आपल्या जीवनात अंगीकार करावा तसेच संविधानाचा योग्य सन्मान असे तुळशिराम भामरे तंटामुक्त अध्यक्ष यांनी सांगितले. तसेच २६ /११ च्या मुंबई येथे झालेल्या हमल्यात शाहिद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गौतम अहिरे, किरण अहिरे, प्रविण अहिरे, सिध्दार्थ अहिरे, गौतम अहिरे, महेंद्र अहिरे, योगेश धनगर, अशोक अहिरे, भावनेश पाटील, विशाल करंके, योगेश पारधी आदी उपस्थित होते.

### बिअरबारात होणार गुन्हेगारांची झडती

धुळे । जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी पदभार घेतल्यानंतर थेट रस्त्यावर उतरून कारवाईला सुरुवात केली आहे. अवैध व्यवसायांचा व्हाइट वॉश सोबत सराईत गुन्हेगारांचाही शोध सुरू झाला आहे. शहरातील अवैध व्यवसायांच्या विरोधात अधीक्षक धिवरे यांनी मोहीम छेडली आहे. या सोबतच सराईत गुन्हेगार व हत्यार जप्तीसाठी शोध मोहीम राबवली जाते आहे. यातून रात्रीच्या वेळी बिअर बारमध्ये जाऊन गुन्हेगारांचा शोध व संशयितांची झडती घेण्यात येते आहे. त्यासाठी स्थानिक पोलिसांना सूचना करण्यात आल्या आहे. या शिवाय स्वतः अधीक्षक धिवरे हे देखील रात्री उशिरा पर्यंत कारवाईत व्यग्र होते.

## पोलीस पाटील संघटनेचे विविध मागण्यांसाठी आझाद मैदानावर २८ नोव्हेबर पासून उपोषण

चिमठाणे । प्रतिनिधी

राज्यातील पोलीस पाटलांच्या विविध मागण्यांसाठी मुंबई येथे महाराष्ट्र राज्य गाव कामगार संघटनेच्या वतीने २८ नोव्हेंबर ते एक डिसेंबर या कालावधीत मुंबई येथील आझाद मैदानावर महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघटनेचे राज्य अध्यक्ष बाळासाहेब शिंदे यांचे नेतृत्वाखाली उपोषण करण्यात येणार आहे. तरी धुळे जिल्ह्यातील पोलीस पाटलांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शिंदखेडा तालुका अध्यक्ष शिवाजी पाटील यांनी केले आहे.



राज्यातील गाव व खेड्यातील काम करून पोलीस पाटील व शासकीय विभागांना मोलाची साथ देणाऱ्या पोलीस पाटलांच्या विविध मागण्या प्रलंबित असून त्यांना वेळेवर मानधन मिळत नाही. अत्यल्प वेतनावर काम करणारे पोलीस पाटील यांना मानधन वाढ करावी, वयोमर्यादा साठ वर्षांहुन ६५ करण्यात यावी. नूतनीकरण कायमचे बंद करण्यात यावे. तसेच शासन दरबारी प्रलंबित असलेल्या मागण्या त्वरित मंजूर करून करण्यात याव्या. अश्या विविध मागणीसाठी मुंबई येथील आझाद मैदानावर उपोषण व धरणे आंदोलन करण्यात येणार असून जिल्ह्यातील पोलीस पाटलांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शिवाजी पाटील महेंद्र पाटील, युवराज माळी यांनी केले आहे.

## बाल सुसंस्कार शिबिरात विद्यार्थ्यांनी गिरवले संस्काराचे धडे

### इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानतर्फे बाल सुसंस्कार व धर्मप्रचार शिबीर संपन्न

श्री.छत्रपती शिवाजी महाराज सैनिकी विद्यालयात आयोजन.

धुळे । प्रतिनिधी



इंदुबाई भदाणे प्रतिष्ठान, बोरकुंड तर्फे आयोजित बाल सुसंस्कार व धर्मप्रचार शिबिरात धुळे ग्रामिणमधील विद्यार्थ्यांनी संस्काराचे धडे गिरवले. मोराणे प्र.नेर येथील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सैनिकी विद्यालयात आयोजीत या १० दिवसीय शिबिराची, काल्याच्या किर्तनाने सांगता करण्यात आली. बाल वयातच संस्कार देऊन, भावी पिढीला सुयोग्य आकार देता यावा या उदात्त हेतुने हे सुसंस्कार शिबीर आयोजीत केल्याबद्दल इंदूबाई भदाणे प्रतिष्ठानप्रती समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

नवीन पिढीत संस्कार हरवत चाललेतं, मुलांवर संस्कार करण्याची गरज आहे. अशी बोंब सर्वदूर उठवली जाते पण संस्कारक्षम पिढी घडविण्यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न होतांना मात्र दिसत नाही. या गोष्टीची निकड लक्षात घेऊन, दिवाळीच्या सुटीत या बाल सुसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले. ह.भ.प.अक्षय महाराज(नाणे) यांच्या संकल्पेतून तसेच बोरकुंड येथील इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे व प्रतिष्ठानच्या सचिव तथा जि.प.सदस्या शालिनीताई भदाणे यांनी सहकार्यातून हे १० दिवसीय निवासी शिबीर संपन्न झाले.

दि. १६ ते २५ नोव्हेंबर दरम्यान आयोजीत या आध्यत्मिक बाल सुसंस्कार व धर्मप्रचार शिबिराची सांगता ह.भ.प.अक्षय महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने करण्यात आली. याप्रसंगी इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानच्या सचिव तथा जिल्हा परिषद सदस्या शालिनीताई बाळासाहेब भदाणे, प्राचार्य एस.बी.बेहेरे, उपप्राचार्य के. के.बाविस्कर, पर्यवेक्षक एस.बी. गरुड तसेच सर्व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी शिबिरातील यशस्वी विद्यार्थ्यांना पांडुरंगाची मूर्ती, शिवरायांची प्रतिमा, शालेपयोगी वस्तू देऊन, शालिनीताई भदाणे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यात पवन हेमराज सूर्यवंशी, यशपाल रुपसिंग राजपूत व सचिन कैलास पाटील यांनी अनुक्रमे प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक मिळविला. या गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच ऋषिकेश सुनील अहिरे याचा आदर्श विद्यार्थी म्हणून सन्मान करण्यात आला. दरवर्षी या शिबिराचे आयोजन करुन, नवीन पिढी संस्कारक्षम बनवू अशी ग्वाही यावेळी शालिनीताईंनी भदाणे यांनी केली तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी अध्यापकवर्ग म्हणून ह.भ.प. प्रविण महाराज (हातानेकर), ह.भ.प.अक्षय महाराज (नाणेकर), ह.भ.प.अशोक महाराज (लोंढवेकर), गौरव महाराज (लोंढवेकर) हे उपस्थित होते. अत्यंत आनंदी व उत्साहीत वातावरणात सुरु असलेल्या या अध्यात्मिक बाल सुसंस्कार व धर्मप्रचार शिबीरास

## पिंपळगाव बसवंत येथील वीटभट्टी परिसरात महिलेची हत्या

### गुन्हा दाखल, संशयित फरार

पिंपळगाव । प्रतिनिधी

येथील निफाड रोडवरील वीटभट्टी परिसरात विवाहित महिलेची हत्या झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पिंपळगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून संशयित आरोपी फरार झाल्याची माहिती समोर आली आहे. निफाड रोडवरील वीटभट्टी परिसरात कायमच गर्दी असते. त्यामुळे याठिकाणी लोक व्यवसाय व कामाच्या निमित्ताने स्थायिक झाले आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, पिंपळगाव बसवंत येथील निफाड रोडवरील वीटभट्टी येथे कामानिमित्त राहण्यासाठी आलेल्या भारती सुरेश पवार (वय २६) या महिलेचा बुधवार (दि. २३ नोव्हेंबर) रोजी सकाळच्या सुमारास मृतदेह वीटभट्टी परिसरातील नदी किनारी आढळून आला होता. त्यानंतर नागरिकांनी पोलिसांना संपर्क केला असता घटनास्थळी तात्काळ पोलीस व रुग्णवाहिका दाखल झाली होती. यानंतर पोलिसांनी मृतदेहाची पाहणी केली असता हत्या झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले असल्याचे पोलीसांनी सांगितले.

CMYK

दैनिक

लक्ष महाराष्ट्र

धुळे-नंदुरबार-नाशिक

सोमवार दि. २७ नोव्हेंबर २०२३





# धुळ्यातील पांझरा उद्यानातील 'लेझर शो'चे प्रदेशाध्यक्ष आ. बावनकुळे यांच्या हस्ते लोकार्पण

## खानदेशातील एकमेव लेझर शो











धुळे । धुळे

शहरासाठी प्रमुख आकर्षण ठरणाऱ्या व सौदर्यांकरणात टाकणाऱ्या पांझरा नदीकिनारी पूर्वीच्या चौपाटीच्या जागेवर साकारलेल्या उद्यानाचे भाजपा प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते कोनशिला अनावरण करुन लोकार्पण करण्यात आले. यावेळी भाजपा महामंत्री विजय चौधरी, माजी मंत्री खा. डॉ. सुभाष भामरे, महापौर प्रतिभा चौधरी, माजी आ. राजवर्धन कदमबांडे, धुळे शहर विधानसभा प्रमुख अनुप अग्रवाल, भाजप महानगर अध्यक्ष गजेंद्र अंपळकर, माजी महापौर चंद्रकांत सोनार, प्रदीप कर्पे, आयुक्त अमिता दगडे-पाटील, उपमहापौर वैशाली वराडे, स्थायी समिती सभापती किरण कुलेवार, सभागृह नेत्या भारती माळी, माजी महापौर जयश्री अहिरराव, माजी उपमहापौर नागसेन बोरसे यांच्यासह भाजप पदाधिकारी व नगरसेवक तसेच नागरिक उपस्थित होते. महापालिकेमार्फत शासनाच्या मूलभूत सेवा सुविधा निधी अंतर्गत सुमारे पाच कोटी व मनपा विकास निधी अंतर्गत सुमारे दोन कोटी अशा एकूण सात कोटी रुपये निधीतून हे उद्यान साकारण्यात आले आहे. जॉगिंग ट्रॅक, कारंजा, रिटेनिंग वॉल, वृक्ष लागवड, भुलभुलय्या, प्लांटेशन, विद्युत व्यवस्था या कामांचा यात समावेश आहे. खानदेशातील एकमेव लेझर शो या ठिकाणी बसविण्यात आला आहे. यावेळी आकर्षक विविध रंगात हा लेझर शो सुमधूर संगिताच्या पार्श्र्वभूमीवर सादर करण्यात आला.

संकलन : दिपक वाघ

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक



# धुळ्यातील पांझरा नदीकिनाऱ्यावरील चौपाटीवर भूलभुलय्या, लेझर शोचे आकर्षण

## विविध रंगांत लेझर शो चालणार संगीतावर


















धुळे । महाराष्ट्र शासनाच्या मूलभूत सेवासुविधा निधी व मनपा विकास शुल्क निधीतून पांझरा नदीकिनारी चौपाटी येथील उद्यानाचे काम महापालिकेने हाती घेतले. शासनाच्या मूलभूत सेवा सुविधा निधींतर्गत सुमारे पाच कोटी व धुळे मनपा विकास निधींतर्गत सुमारे दोन कोटी अशा एकूण सात कोटी निधीतून हे उद्यान पूर्णत्वास आले आहे.उद्यानात जॉगिंग ट्रॅक, कारंजा, वृक्षलागवड, भूलभुलय्या, विद्युत व्यवस्था आदी विविध कामे करण्यात आली आहेत. या नूतन उद्यानाचे वैशिष्ट्य म्हणजे खानदेशातील एकमेव लेझर शो या ठिकाणी बसविण्यात आला आहे. विविध रंगांत हा लेझर शो संगीतावर चालणार आहे. लेझर शो उद्यानाचे प्रमुख आकर्षण असून, लोकार्पण सोहळ्याच्या दिवशी धुळेकर नागरिकांसाठी मोफत दाखविला जाणार आहे. सुमारे साडेतीन ते चार एकर परिसरातील हे उद्यान धुळे शहरातील आबालवृद्धांसाठी आकर्षण ठरणार आहे.

संकलन : दिपक वाघ